बी.एम. प्रतिष्ठान
बी.एम. प्रतिष्ठान महाराष्ट्र राज्य
संस्थापक अध्यक्ष बाळासाहेब भगवानराव मस्के

दैनिक बीड
# पुण्यभूमी
संपादकःबाळासाहेब मस्के

बीड | सोमवार,दि.५ऑगस्ट २०२४ | वर्षे४रे | अंक७ला | पाने ६ | दररोजच्या घडामोडीसाठी वाचत रहा... पुण्यभूमी | https://Paper.epunyabhumi.in | RNI No : MAHAMAR/2021/81902 | ₹ ३

## कोण कुणाला ढेकूण म्हणत

मुंबई:उद्धव ठाकरेंनी पुण्यातल्या सभेत देवेंद्र फडणवीस यांचा उल्लेख टरबूज असा केला. तसंच मी आता अमित शाह यांना अहमदशाह अब्दाली असं म्हणणार असंही उद्धव ठाकरे म्हणाले. त्यानंतर देवेंद्र फडणवीस यांनीही त्यांना उत्तर दिलं. देवेंद्र फडणवीस यांचा उल्लेख उद्धव ठाकरेंनी ढेकूण असाही केला होता. ठाकरे–फडणवीस वादावर आता अजित पवारांनी भाष्य केलं आहे. बारामतीतल्या सांगवी या ठिकाणी अजित पवार  बोलत होते. आता लढाई मैदानात आहे, मी मुंबईत म्हणालो की एक तर मी तर राहीन किंवा तू तरी राहशील. इथे एक पोस्टर लागलंय. त्यातील फोटोत माझ्या पायाशी एक कलिंगड ठेवलंय. काहींना वाटलं की मी त्याला आव्हान दिलेय. पण, ढेकणांना आवाहन द्यायचं नसतं तर बोटाने चिरडायचं असतं. मी आव्हान द्यावं इतका मोठा तू नाहीस. काहीजणांना वाटलं की मी त्याला आवाहन दिलेय.

# पांढऱ्या दुधाच्या बोक्यांवर अमावस्याचा अंधार!

कडा/पुण्यभूमी प्रतिनिधी

आष्टी तालुक्यात कडा येथे दोन ठिकाणी  आणि टाकळी अमीया एका ठिकाणी  जिल्हाधिकाऱ्यांच्या नेतृत्वाखाली अन्न औषध विभागाने कारवाई करत दुधाची गुणवत्ता वाढवण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या पावडर सह दूध भेसळीचे साधारण १९ लाखाचे  साहित्य जप्त केले आहे . आष्टी तालुक्यातील कडा येथे टाकळी फाटा रस्ता तसेच कृषी उत्पन्न बाजार समिती जवळ अशा दोन ठिकाणी आणि टाकळी ( अमिया ) येथील एका दूध संकलन केंद्रावर  रविवारी भल्या पहाटे जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी  बीड , धाराशिव आणि अहमदनगर येथील अन्न औषध प्रक्रिया विभागाच्या अधिकार्यासह टाकलेल्या छाप्यामध्ये विविध प्रकारच्या पावडरसह दूध भेसळीसाठी वापरले जाणारे साहित्य जप्त केले आहे.

## खळबळ : कारवाईला तीन जिल्ह्यातले अधिकारी,म्हणजे प्रकरण मोठंच?





### दुधाची गुणवत्ता वाढविण्यासाठी पावडरचा वापर ?

मध्यंतरी दुधाचे दर पडल्यानंतर राज्य शासनाने दुधाला प्रति लिटर पाच रुपये प्रमाणे अनुदान देण्याचे जाहीर केले आहे परंतु हे अनुदान मिळवण्यासाठी ३.२ फॅट व ८.३ एसएनएफ असे गुणवत्तेचे प्रमाण ठेवले आहे. कमी प्रतीच्या दुधास शासन अनुदान देत नाही. त्यामुळे दुधाची गुणवत्ता वाढविण्यासाठी या दूध पावडरचा उपयोग केला जात असल्याची चर्चा आहे.

### कारवाई झाली पुढे काय ?

अन्न औषध प्रशासनाचे अधिकारी भेसळ होत असल्याच्या संशयावरून एखाद्या दुकानावर, दुध संघावर छापा टाकतात. मात्र, एक छापा टाकला तरी त्याच्या तपासणीचे नमुने लवकर प्राप्त होत नाहीत, त्या कारवाईचे पुढे काय होते, हे नागरिकांना कळत नाही. मात्र, अशी कारवाई झाली की संबंधीत भेसळीवाले साहेब पुढे काय करतात, त्यानंतर कारवाईला विश्रांती मिळते, त्यामुळे फार्स नको तर प्रत्यक्षात कठोर कारवाई करावी, अशी मागणी सर्वसामान्य जनतेकडून होत आहे.

### जिल्हाधिकाऱ्यांकडून पाहणी

या दुध भेसळी प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन रविवारी सकाळी जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी घटनास्थळी भेट देत पाहणी केली.

आष्टी तालुक्यातील टाकळी अमिया येथील अंबादास पांडुरंग चौधरी याचे कडा येथील टाकळी अमिया रोडलगत साईदत्त एंटरप्रायजेस नावाने दुकान व लगत पत्र्याच्या शेडमध्ये गोडाऊन आहे. गोपनिय माहितीच्या आधारे अन्न व पोलीस प्रशासनाने रविवारी पहाटे या ठिकाणी धाड टाकली. गोडाऊनची पाहणी केली असता भेसळयुक्त दुधाची निर्मिती करण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या पावडरचा मोठा साठा आढळून आला. या कारवाईने आष्टीत मोठी खळबळ उडाली आहे. सदर  कारवाई अन्न सुरक्षा अधिकारी संदिप देवरे, अनुराधा भोसले, सहाय्यक आयुक्त कांबळे, आष्टीचे प्रभारी पोनि विक्रांत हिंगे, सहायक पोलीस निरीक्षक विजय नरवाडे, स्थानिक गुन्हे शाखा, पोलीस उपनिरीक्षक कृष्णा शिंदे, पोलीस हवालदार बबुशा काळे, पोलीस नाईक प्रवीण क्षीरसागर, विकास जाधव, अंमलदार मजरूद्दीन सय्यद, सचिन गायकवाड, दिपक भोजे, सचिन पवळ, महिला अंमलदार जिजाबाई आरेकर, अर्चना आरडे, यांनी केली.

## एससी,एसटी उपवर्गीकरण करण्याचा निर्णय घटनाबाह्य

### प्रकाश आंबेडकर : कोर्टाचा संपूर्ण निर्णय आम्हाला मान्य नाही



यवतमाळ पुण्यभुमी प्रतिनिधी  वंचित बहुजन आघाडीचे नेते  ऍड. प्रकाश आंबेडकर म्हणाले की, एससी एसटी आरक्षणासंदर्भात सुप्रीम कोर्टाने दिलेल्या निर्णयाचे आम्ही स्वागत करतो. पण संपूर्ण निर्णय आम्हाला मान्य नाही. त्यामुळेच सुप्रीम कोर्टाने दिलेल्या निकालांमधील अर्ध्या निकालाचे आम्ही स्वागत करतो. पण सुप्रीम कोर्टाने जे वर्गीकरण करण्याचा निर्णय घेतला आहे, तो वादग्रस्त आहे. याला मात्र आमचा तीव्र विरोध आहे. त्याचे कारण म्हणजे वर्गीकरण करण्याचा अधिकार सुप्रीम कोर्टाला नाही. आरक्षणाचे वर्गीकरण करण्याचा अधिकार घटनेमध्ये कोणालाच दिलेला नाही. त्यामुळे संसदही यामध्ये हस्तक्षेप करू शकत नाही. आरक्षणाचे वर्गीकरण करण्याचा निर्णय हा घटनाबाह्य आहे. कोर्टाने या प्रकरणात क्रिमिलियरचा मुद्दा विचारात घेतला. त्यालाही आमचा विरोध आहे. सुप्रीम कोर्ट धोरणात्मक निर्णय घेऊ शकत नाही. कोर्ट न्यायालयीन कक्षेच्या बाहेर गेले आहे. कोर्टाने आपला निर्णय मागे घ्यावा.

प्रकाश आंबेडकर म्हणाले की, न्यायव्यवस्थेमध्ये पान २ वर...

## धनंजय मुंडेंच्या नाथऱ्यात गोळीबार

### खळबळ : परळी ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा

परळी/पुण्यभूमी प्रतिनिधी

परळी तालुक्यातील मौजे नाथरा येथे उसने पैसे मागणीच्या कारणावरून एकास कानपट्टीला पिस्तूल लावून जीवे मारण्याच्या उद्देशाने गोळीबार केल्याची घटना दि. ३ ऑगस्ट २०२४ रोजी दुपारी ३ वा.च्या सुमारास सोनपेठ रोड लगत घडली आहे. सदरील प्रकरणातील आरोपी फरार असून या प्रकरणी ग्रामीण पोलीस ठाण्यात सदरील आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास ग्रामीण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक मनीष पाटील हे करीत आहेत. दरम्यान सदरील घटनेमुळे परळी तालुक्यात एकच खळबळ उडाली आहे.

याबाबत ग्रामीण पोलिस सूत्राकडून प्राप्त माहिती अशी की, महादेव केशव मुंडे वय ३७ वर्ष व्यावसाय शेती रा. नाथरा ता. परळी वैजनाथ जिल्हा बीड यांना आरोपी प्रकाश अशोक मुंडे रा. नाथरा ता.परळी यांनी  मला पन्नास हजार रूपये उसणे दे अशी मागणी केली. परंतु महादेव मुंडे यांनी ५० हजार रूपये उसणे देण्यास नकार दिला. याच कारणावरून शिवीगाळ व धक्काबुक्की करून मला पैसे द्यावेच लागतील असे म्हणुन कानपट्टीवर पान २ वर...



**परळी :** औष्णिक विद्युत केंद्राचे प्रभारी उपमुख्य अभियंता हिम्मतराव अवचार यांचा वाढदिवसानिमित्त सत्कार करतांना उपकार्यकारी अभियंता गजेंद्र धनोरीया, उपकार्यकारी अभियंता इमरान मणियार, भगवान साकसमुद्रे, यशोधन अवचार, गणेश गित्ते, आयान मणियार, काशिनाथ भंडारे आदी.

## बांगलादेशमध्ये पुन्हा हिंसाचार!

### ९१ जणांचा मृत्यू: अनिश्चित काळासाठी संचारबंदी लागू!



दिल्ली/पुण्यभूमी प्रतिनिधी

बांगलादेशमध्ये पुन्हा एकदा हिंसाचार उफाळून आला आहे. या हिंसक घटनेत ९१ जणांचा मृत्यू झाला आहे. तर १०० पेक्षा अधिक जण जखमी झाले आहेत. या घटनेनंतर बांगलादेशमध्ये अनिश्चित काळासाठी कर्फ्यू लावण्यात आला असून इंटरनेटदेखील बंद करण्यात आले आहे. महत्त्वाचे म्हणजे भारत सरकारनेही या घटनेनंतर बांगलादेशमधील भारतीय नागरिकांनी सुरक्षित स्थळी राहण्याच्या सुचना दिल्या आहेत. तसेच येथील भारतीय नागरिकांसाठी हेल्पलाईन नंबरदेखील जारी करण्यात आला आहे.

द इंडियन एक्सप्रेसने दिलेल्या वृत्तानुसार, आज ( रविवारी) पंतप्रधान शेख हसीना यांच्या राजीनाम्याची मागणी करण्यासाठी काही नागरिकांनी अहसहकार आंदोलनाची घोषणा केली पान २ वर...

### पोलीस आणि आंदोलकांमध्येही संघर्ष

याशिवाय काही आंदोलनकांनी ढाक्याच्या शाहबाग भागातील बंगबंधू शेख मुजीब वैद्यकीय महाविद्यालयासह या भागातील काही कार्यालय आणि आस्थापनांवरही हल्ले केले. विशेष म्हणजे काही आंदोलक लाठ्या–काठ्या घेऊन शाहबाग चौकात जमले, तेव्हा पोलीस आणि आंदोलकांमध्ये जोरदार संघर्ष झाला. यावेळी आंदोलकांना पांगवण्यासाठी पोलिसांना अश्रूधुरांच्या नळकांड्या फोडाव्या लागल्या.

**डॉ.नंदकुमार उघाडे** | जनतेने बदल घडवून आणला तो का?

# एक पत्र खासदार बजरंग बाप्पांना

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

जनतेचे कल्याण करण्यासाठी लोकसभा सभागृहाला मुबलक प्रमाणात अधिकार प्राप्त झालेले आहेत. त्या सभागृहात बीडच्या जनतेने आपला प्रतिनिधी म्हणून आपणास पाठविले आहे. लोकसभा सदस्य म्हणून मिळालेल्या अधिकारांचा वापर आपण सद्सदविवेक बुद्धीने लोककल्याणासाठी आणि देशाच्या विकासासाठी करत आहात तसे आपण कृतीतून दाखवत आहात त्याबद्दल धन्यवाद ! असे ज्येष्ठ पत्रकार व राज्यघटनेचे अभ्यासक डॉ . नंदकुमार उघाडे यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे.




देशातील सर्वच समाज घटकांना आपल्या सोबत घेऊन जाण्याचा घटनात्मक मार्ग अवलंबून सर्व धर्मीयांच्या मनात बंधुभाव निर्माण करून देशाची एकता आणि एकात्मता टिकविण्यासाठी प्रोत्साहन देण्याची जबाबदारी लोकप्रतिनिधी म्हणून आपल्यावर आली आहे. ती आपण योग्य प्रकारे पार पाडत आहात आणि इथून पुढेही नक्कीच पार पाडत राहाल याचा सार्थ विश्वास आहे. निवडणुकीनंतर विरोधकांची व प्रतिस्पर्ध्यांची उणी – दुणी  काढत बसण्यापेक्षा आपण जनतेचे प्रश्न व समस्या सोडविण्यावर भर देत आहात ही आनंदाची गोष्ट आहे. बीडच्या जनतेने बदल घडवून आणला तो का ? आणि कशासाठी ? याचे चिंतन आणि मनन करून आपण कार्य करत आहात ही उल्लेखनीय बाब आहे . भारतीय जनता आता भावनिक मुद्द्यांऐवजी विकासात्मक मुद्द्यावर भर देत आहे , ही गोष्ट लोकसभेच्या निकालावरून सर्वांच्या लक्षात आली आहे. लोकप्रतिनिधीकडून काही विकासात्मक योजना राबवल्या जाव्यात अशी जनतेची अपेक्षा असते आणि ती रास्तच आहे.

आपण काही दिवसांपूर्वी शासकीय रुग्णालयाला भेट दिली. जबाबदार व्यक्तींना जनहितासाठी काही प्रश्न विचारले. ते पाहून  जिल्ह्यातील जनतेच्या आपणाकडून असलेल्या अपेक्षा जास्तच पल्लवीत झाल्या. अशाप्रकारे अधून – पान २ वर...




# गुगलीचे गारूड!

अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांना नितीन गडकरी यांनी लिहिलेल्या पत्रातील मुद्दे अयोग्य आहेत असे एकही सज्ञान आणि सुविद्या व्यक्ती म्हणू शकणार नाही. हे पत्र आयुर्विमा आणि वैद्याकीय विमा यांच्या हप्त्यांवर आकारण्यात येणाऱ्या वस्तू व सेवा कराबाबत आहे. सद्या:स्थितीत या दोन्हीही विम्यांवर १८ टक्के इतका सणसणीत कर आकारला जातो. गडकरी यांस नागपुरातील आयुर्विमा महामंडळाच्या स्थानिक कर्मचाऱ्यांनी या संदर्भात निवेदन दिले आणि या कराबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली. यातील कर्मचारी हा घटक महत्त्वाचा. अशासाठी की विमा काढणारे मध्यमवर्गीय या अन्याय्य कराबाबत मिठाची गुळणी घेण्यात धन्यता मानत असताना विमा महामंडळाच्या कर्मचाऱ्यांना मात्र या कराबाबत तीव्र नाराजी नोंदवावीशी वाटली; ही बाब कौतुकास्पद. त्याहूनही अधिक कौस्तुकास्पद गडकरी यांनी या मागणीची घेतलेली दखल. त्यांनी या कर्मचाऱ्यांचे निवेदन स्वीकारताना शाब्दिक सहानुभूती व्यक्त करून हा मुद्दा सोडून दिला नाही. त्यांनी आपल्या मंत्रिमंडळातील सहकारी अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांस पत्र लिहिले आणि हा कर मागे घेतला जावा, अशी मागणी केली. गडकरींचे कौतुक या मागणीसाठी. ही मागणी मान्य होणारी नाही आणि तीबाबत अर्थमंत्री असल्या तरी निर्मलाबाईदेखील काही करू शकत नाहीत, हे माहीत असतानाही त्यांनी हे पत्र लिहिले. खरे तर त्यावर निर्णय अपेक्षित असेल तर हे पत्र पंतप्रधानांनाच लिहावयास हवे, हे गडकरी यांस ठाऊक असणारच. खेरीज निर्मलाबाई या काही आपल्यासारख्या धडाकेबाज निर्णय घेणाऱ्या नाहीत, त्या पंतप्रधानांच्या शब्दाबाहेर नाहीत, हेही गडकरी यांस ठाऊक असेलच. तरीही त्यांनी हे पत्र अर्थमंत्र्यांकडे पाठवले कारण त्यांना डावलून निर्णयासाठी हा विषय पंतप्रधानांकडे नेला असता तर निर्मलाबाईंचा अधिक्षेप झाला असता. तसे काही करण्याची गरज नव्हती. गडकरींनी अर्थमंत्र्यांकडे करकपातीची मागणी केली आणि त्याची रास्त प्रसिद्धी झाल्याने हा विषय योग्य प्रकारे चर्चेत आला. तो महत्त्वाचा असल्याने त्यावर भाष्य आवश्यक ठरते.

आपल्या देशात अद्यापही विमा आणि आयुर्विमा यांचे प्रमाण अत्यल्प आहे. त्यातही वैद्याकीय विमा– तोही वैद्याकीय उपचारांच्या खर्चाचे आव्हान पेलेल इतक्या रकमेचा– असलेल्यांची संख्या आणखी कमी. दरवर्षी भरभक्कम रक्कम खर्च करून वैद्याकीय विमा जिवंत ठेवावा लागतो. ''वैद्याकीय विमा घेतला आणि त्याची गरजच लागली नाही'' असे म्हणत पैसे 'वाया' गेल्याची तक्रार करणारे आपल्याकडे सुशिक्षितांतही सर्रास भेटतात. या विम्याच्या गरजेबाबत तितकी जागृती आपल्याकडे नाही. त्यामुळे घरातील कोणी आजारी पडले की उपचारांच्या खर्चाची रक्कम उभी करण्यात इतरांची दमछाक होते. मध्यमवर्गीयांस सरकारी रुग्णालये नकोशी असतात आणि तारांकित खासगी परवडत नाहीत. म्हणून मग 'ना इकडच्या ना तिकडच्या' अशा कोणा रुग्णालयांत उपचारार्थ दाखल व्हावे लागते. हे असे होते कारण वैद्याकीय विम्याचा अभाव. त्यात आपल्या देशात इंग्लंडप्रमाणे उपचारांची हमी देणारी 'राष्ट्रीय आरोग्य सेवा'ही नाही. परिणामी अशा आजारी व्यक्तींच्या कुटुंबीयांच्या हालास पारावर राहात नाही. अशा परिस्थितीत निदान वैद्याकीय विमा तरी अधिकाधिक लोकप्रिय कसा होईल यासाठी प्रयत्नांची गरज असताना या विम्याच्या वार्षिक वर्गणीवर १८ टक्के इतका सणसणीत कर आपल्याकडे आकारला जातो. त्याची वसुली केली जाते अर्थातच विमा खरेदी करणाऱ्या ग्राहकांकडून. म्हणजे दंडावर भुर्दंड म्हणायचा. ही करवाढ केंद्र सरकारच्या अखत्यारीतील आहे आणि त्याच केंद्र सरकारात नितीन गडकरी हे महत्त्वाच्या खात्याचे मंत्री आहेत. आपल्याच एका सहकारी मंत्र्याच्या खात्यासंदर्भातील मागणीस त्यांनी जाहीर पाठिंबा दिलेला आहे. आणि ही घटना विद्यामान पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना ताज्या निवडणुकीत भाजपस अपेक्षित यश मिळवून देण्यात अपयश आल्यानंतर घडलेली आहे. ही यातील अत्यंत कळीची बाब. मोदी आपला 'चारसो पार'चा नारा खरा करू शकले असते तर 'एखादी व्यक्ती परमेश्वर होऊ शकत नाही' वगैरे विधाने ज्या प्रमाणे केली गेली, तशी ती कुणी केली असती किंवा काय असा प्रश्न उपस्थित होतो; त्या प्रमाणे स्वत: सहभागी असलेल्या सरकारच्या करप्रणाली विरोधातील मतास केंद्रीय मंत्र्यांकडूनच असा पाठिंबा मिळाला असता काय, असाही प्रश्न उपस्थित होऊ शकतो. गडकरी यांची ही कृती आणखीही काहींच्या अशा संभाव्य कृतीस दिशादर्शक असू शकते, हे सत्यही या निमित्ताने विचारात घेणे इष्ट. जनमताचा कौल विरोधी जाऊ लागला की पक्षांतर्गत लोकशाही फुलू लागते. हे सर्वच पक्षांत होते आणि भाजप त्यास अपवाद असेल असे मानायचे काहीही कारण नाही. आज गडकरी बोलले. उद्या योगी आदित्यनाथ वा आणखी कोणी अशी मागणी करेल. सत्तेस पाठिंबा देणाऱ्या चंद्राबाबू नायडू वा नितीश कुमारांपैकी कोणी अशा मागण्यांस पाठिंबा देऊ शकतात. स्वत:च्याच सरकारवर गडकरींनी अशा तऱ्हेने गुगली टाकलेली आहे. तिचे गारूड काहींस मोहवण्याची शक्यता नाकारता येत नाही.

# निकालाचे आव्हानात्मक वास्तव



अजूनही अतिमागासलेला राहिलेल्या घटकाला काहीसे झुकते माप दिले पाहिजे, या अर्थाने सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाचे स्वागत केले पाहिजे. पण हे वर्गीकरण जात हा घटक मानून केले जाणार की, अनुसूचित समाविष्ट असलेल्या सर्वच जातींतर्गत केले जाणार आहे, हा कळीचा प्रश्न आहे.

आरक्षणाच्या लाभापासून आजही कोसो दूर असलेल्या देशातील अनुसूचित जातींमधील अतिमागासांना घटनात्मक न्याय मिळावा, यासाठी मागासलेल्या जातींमध्येच वर्गीकरण करण्यास मान्यता देणारा सर्वात मोठा आणि क्रांतिकारक असा निकाल सर्वोच्च न्यायालयाने दिला आहे. अतिमागास, तसेच ज्यांना आरक्षणाचा लाभ अजून मिळेला नाही, त्यांना या वर्गीकरणातून किंवा उपवर्गीकरणातून स्वतंत्र आरक्षण देण्यासंबंधीचा हा निकाल आहे.आता हा विषय या देशातील हजारो वर्षे सामाजिक अवहेलना, अत्याचार सहन केलेल्या, सहन करीत असलेल्या पूर्वाश्रमीच्या अस्पृश्य मानल्या गेलेल्या अनुसूचित जातीअंतर्गत उपवर्गीकरणापर्यंत येऊन थांबला आहे. काही राज्यांतील सरकारांनी या निकालाचे स्वागत केले आहे. महाराष्ट्रात उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी लगेचच सर्वोच्च न्यायालयाच्या या निर्णयाची अंमलबजावणी करण्यासाठी राज्यात स्वतंत्र आयोग स्थापन करण्याची घोषणा केली आहे.देशात घटनात्मक आरक्षण धोरणाची अंमलबजावणी सुरू झाली, त्याला सात दशकांचा कालावधी होऊन गेला. तरीही मागासलेल्या समाजांचे सर्वव्यापी मागासलेपण अजूनही गेलेले नाही, हे या सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाने पुन्हा एकदा अधोरेखित केले आहे. त्यामुळे मागासांमधील अतिमागास घटकांना पुढे आणण्यासाठी वेगळी किंवा विशेष तरतूद करण्याची आवश्यकता आहे, ते कुणीही नाकारणार नाही. भारतीय संविधानातील सामाजिक न्यायाचे तत्त्व हेच निर्देशित करते. अमेरिकन लेखक–विचारवंत जॉन रॉल्स यांनी न्यायाचा सिद्धांत (थिअरी ऑफ जस्टिस) मांडला आहे. समान संधी मिळूनही एखादा वर्ग उपेक्षित राहात असेल तर, त्याला थोडे झुकते माप देणे न्याय्य ठरेल, असे त्यांनी आपल्या न्याय सिद्धांतात म्हटले आहे. या अर्थाने सर्वोच्च न्यायालयाचे या निकालाचे स्वागत आणि समर्थन करायला हवे. परंतु या निकालाच्या निमित्ताने सामाजिक आणि विशेषत: राजकीय क्षेत्रात जी चर्चा सुरू झाली आहे, त्यामुळे या न्यायालयीन निकालाचा आपण अर्थ कसा घेतो, त्याचा अन्वयार्थ कसा लावतो, हे अत्यंत महत्त्वाचे ठरणार आहे.

ही चर्चा सामाजिक भेगा अधिक रुंदावणारी आहे, असे खेदाने म्हणावे लागते. न्यायालयाच्या निर्णयाकडे सकारात्मकतेने न बघता, अनुसूचित जातींमध्येच कलहाची बिजे टाकली जात आहेत, हे चिंताजनक आहे. मागासांमधील काहींची म्हणजे १०–१५ टक्के समाजाची आरक्षणाच्या माध्यमातून प्रगती झाली असेल तर, त्यामुळे इतर जाती मागास राहिल्या, असाही चर्चेचा सूर आहे आणि तो द्वेषमूलक आहे. मुळात सरकारी नोकऱ्यांचे आणि आरक्षणाच्या अंमलबजावणीचे वास्तव काय आहे आणि ज्यांना वर्गीकरणाची घाई झाली आहे, त्या सत्ताधारी राजकीय पक्षांची आरक्षणाबाबतची नेमकी काय भूमिका आहे, हेही समजून घेतले पाहिजे.शेवटी आरक्षण कशासाठी याचा उद्देश आपल्या संविधानाच्या प्रस्ताविकेत स्पष्ट नमूद केलेला आहे. म्हणून संविधानातील आरक्षणासंबंधीचे अनुच्छेद आणि संविधानाची उद्देशिका एकत्र वाचली पाहिजे. संधीची समानता आणि समानतेची संधी हा आरक्षणाशी संबंधित त्यातील उल्लेख महत्त्वाचा आहे. संधीची समानता आरक्षणाशी संबंधित आहे आणि दर्जाची समानता ही व्यक्तीच्या सामाजिक प्रतिष्ठेशी संबंधित आहे. आपल्या देशात जातीतील जन्मावरून व्यक्तीची प्रतिष्ठा ठरविली जाते, त्यासाठी तो आर्थिकदृष्ट्या गरीब आहे की श्रीमंत आहे, हा प्रश्नच येत नाही. हा भेद नष्ट करण्यासाठी संविधानकर्त्यांनी संधीच्या समानतेबरोबर दर्जाच्या समानतेची ग्वाही देशाला दिली. अनुसूचित जातींचा आरक्षणाच्या माध्यमातून थोडाबहुत आर्थिक विकास होईल, परंतु सामाजिक दर्जा व प्रतिष्ठा ही जाती व्यवस्था संपुष्टात आल्याशिवाय प्राप्त होणार नाही. ५ मे २०२१ रोजी सर्वोच्च न्यायालयाने महाराष्ट्र सरकारच्या एसईबीसी आरक्षण कायद्यासंदर्भातील निकालपत्रात जाती व्यवस्थेने निर्माण केलेल्या सामाजिक विषमतेवर महत्त्वाचे भाष्य केले आहे. ते असे की, जातीवर आधारित सामाजिक दर्जामधील भेदभाव नष्ट केला तरच, सर्व जाती समान पातळीवर येतील आणि जातीविहीन समाजाच्या पुनर्रचनेची ती सुरुवात असेल. सर्वोच्च न्यायालयाने एक प्रकारे हा मोलाचा संदेश दिला आहे. त्याचा सर्वांनीच गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे.

# गोपीनाथराव मुंडेंचे शिक्षण झालेली शाळा बनली धोकादायक

## तत्परता : चित्रकला परीक्षेचे केंद्र स्थलांतरित करण्याची मागणी




परळी/पुण्यभूमी प्रतिनिधी

दिवंगत लोकनेते माजी केंद्रीय मंत्री गोपीनाथराव मुंडे यांनी आपले माध्यमिक शिक्षण घेतलेले परळी येथील जिल्हा परिषद माध्यमिक शाळा आज अत्यंत धोकादायक अवस्थेत आली आहे. त्यामुळे शाळेत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थी व शिक्षकांच्या जीवितास धोका असून नवीन अद्यावत इमारत बांधून द्यावी अशी मागणी पालक व शाळा व्यवस्थापन समितीच्या वतीने करण्यात येत आहे. तसेच सप्टेंबर मध्ये होणाऱ्या चित्रकला परीक्षा केंद्र रद्द करून दुसरीकडे स्थलांतरित करावे अशी मागणी ही होत आहे.

परळी शहरातील ऐतिहासिक अशी वास्तू पैकी एक असलेली जिल्हा परिषद माध्यमिक शाळेचे बांधकाम निजाम काळामध्ये १९३५ ला पूर्ण झाले व त्याच वर्षी शाळा सुरू झाली. या बिल्डिंगला ८९ वर्ष झाले आहेत. शाळेच्या छताला मोठे मोठे खड्डे पडले असून अनेक ठिकाणी छताला सपोर्ट दिलेले जुने लाकडी खांब निघून पडत आहेत. तसेच खिडक्या दरवाजे मोडके झाले आहेत.

दिवंगत लोकनेते माजी केंद्रीय ग्रामविकास मंत्री गोपीनाथराव मुंडे यांनी आपले माध्यमिक शिक्षण या शाळेतून पूर्ण केले होते. जिल्हा परिषद शाळेने परळीच्या वैभवात भर घातलेली आहे. अनेक डॉक्टर, प्राध्यापक, वकील, विचारवंत व्यवसायिक या शाळेने परळीला दिलेले आहेत. त्यामुळे या शाळेला विशेष असे महत्त्व आहे .नवीन वर्ग उपलब्ध करून द्यावे अशी मागणी गटशिक्षणाधिकारी ,शिक्षणाधिकारी यांच्याशी पत्रव्यवहार करूनही कुठलेही शाळेचे काम झाले नाही.येत्या १५ सप्टेंबर रोजी चित्रकला परीक्षेचे सेंटर या ठिकाणी देण्यात आले आहे. नवीन ज्या वर्ग खोल्या बांधण्यात आले आहेत त्यापैकी सध्या सहा वर्ग खोल्यांमध्ये मराठी आणि उर्दू माध्यमाचे ४०० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत .त्यामुळे चित्रकला परीक्षेस येणारे ८०० ते १००० विद्यार्थी कसे आणि कोठे बसवायचे हा प्रश्न आहे. जुन्या इमारतीत कोणत्याही प्रकारच्या भौतिक सुविधा नाहीत. ज्या ठिकाणी विद्यार्थ्यांची सोय होईल अशा ठिकाणी सेंटर देण्यात यावे अशी मागणी पालक व शाळा व्यवस्थापन समितीच्या वतीने करण्यात आलेली आहे.

# पान एक वरून

**एससी,एसटी उपवर्गीकरण करण्याचा...**

आधी प्रतिनिधित्व हवे! न्यायव्यवस्था उपेक्षित आणि दलित जातींवर (राखीव प्रवर्ग) निर्णय देत आहे आणि स्वतःच्याच पाठीवर थाप मारून घेत आहे, पण ते कधी स्वतःमध्ये डोकावून पाहतील तर त्यांच्या लक्षात येईल की, न्यायव्यवस्थेत प्रतिनिधित्व देण्यात आलेले नाही. किंवा खरी स्थिती अशी आहे की, उच्चवर्णीयांमध्ये मागासलेपणा आहे आणि खुल्या प्रवर्गात वर्गीकरण व्हायला हवे! मग हा दांभिकपणा कशासाठी? अनुसूचित जाती आणि जमातींसाठी सकारात्मक धोरण हे आर्थिक मार्गानी गरीबी हटवण्याचे धोरण नसून सामाजिक न्यायासाठीचे हत्यार आहे. दलितांना वगळण्यात आले होते आणि ते प्रशासनाचा भाग नव्हते आणि त्यांना सैन्यात भरती करण्यात आले नव्हते. सकारात्मक धोरणातून अत्याचारितांवर झालेला अन्याय दूर करणे अपेक्षित आहे. मी दलितांकडे मागणी करतो की त्यांनी तथाकथित दलितप्रेमी पक्ष (भाजप आणि काँग्रेस) ज्यांनी अनुसूचित जातींच्या वर्गीकरणाच्या निर्णयाचे स्वागत केले त्यांना याबद्दलची जबाबदारी घ्यायला लावावी.

या सोबत आंबेडकरांनी एक फोटो देखील शेअर केला आहे. या फोटोमध्ये एक चार्ट देण्यात आला आहे ज्यामध्ये उच्च न्यायालयांमध्ये न्याय व्यवस्थेतील २०१८ ते २२ यादरम्यान नियुक्त करण्यात आलेले न्यायाधीश आणि त्यांच्या जातीची आकडेवारी मांडण्यात आलेली आहे. ज्यामध्ये खुल्या प्रवर्गातील न्यायाधीशांची संख्या ४२४ दाखवण्यात आली आहे जी एकूण संख्येच्या ७९ टक्के इतकी आहे. तर ५७ ओबीसी (११ टक्के), अल्पसंख्याक १४ (२.६ टक्के), एससी १५ (२.८ टक्के), एसटी ७ (१.३ टक्के) आणि इतर २० असल्याचे दाखवण्यात आले आहे.

**धनंजय मुंडेंच्या नाथऱ्यात...**

पिस्तुल लावुन महादेव केशव मुंडे यांना जिवे मारण्याच्या उद्देशाने गोळी मारली. परंतु आरोपीच्या हाताला झटका दिल्याने गोळी बाजुला गेली. सदरील घटना ही सतीश संभाजी मुंडे यांच्या सोनपेठ रोड लगत असलेल्या दुकानाच्या रिकाम्या गाळ्यामध्ये नाथरा येथे घडली आहे. पिस्तुल मधुन गोळी मारून जिवे मारण्याचा प्रयत्न केला केल्या प्रकरणी महादेव केशव मुंडे यांच्या फिर्यादीवरून परळी ग्रामीण पोलीस ठाण्यात आरोपी प्रकाश अशोक मुंडे याच्यावर गुन्हा रजिस्टर नंबर २२६/२०२४ कलम १०९, ११५, ३५२, ३५१(२), ३५१(३),बी एन एस व सहकलम ३/२५ आर्म ॲक्ट भादविनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**बांगलादेशमध्ये पुन्हा ...**

होती. त्यानुसार हे नागरिक या आंदोलनात सहभागी होण्यासाठी ढाक्यातील सायन्स लॅब चौकात दाखल झाले होते. मात्र, यावेळी त्यांना अवामी लीग, छात्र लीग आणि जुबो लीगच्या कार्यकर्त्यांनी जोरदार विरोध केला. त्यानंतर दोन्ही गटांमध्ये जोरदार हाणामारी सुरू झाली.

भारत सरकारकडून हेल्पलाईन नंबर जारी

दरम्यान, या घटनेनंतर आता बांगलादेशच्या गृहमंत्रालयाने देशात अनिश्चित काळासाठी कर्फ्यूची घोषणा केली आहे. तसेच इंटरनेटदेखील बंद करण्यात आले आहे. महत्त्वाचे म्हणजे या घटनेनंतर भारत सरकारने बांगलादेशमधील भारतीयांना घराबाहेर न पडण्याच्या सुचना केल्या आहेत. तसेच भारतीय नागरिकांच्या मदतीसाठी हेल्पलाईन नंबरदेखील जारी केला आहे. बांगलादेशमधील भारतीय नागरिकांना कोणतीही मदत हवी असल्यास +८८–०१३१३०७६४०२ या क्रमांकावर संपर्क करावा, असे आवाहन भारतीय दुतावासाकडून करण्यात आलं आहे.

**एक पत्र खासदार बजरंग...**

मधून , महिना – दोन महिन्यात प्रत्येक शासकीय कार्यालयाला तेथील कामकाज कसे चालले आहे, ते पाहण्यासाठी व जनतेच्या समस्या जाणून घेण्यासाठी एखादी भेट होणे अपेक्षित आहे. यामुळे जनता व प्रतिनिधी यातील अंतर कमी होऊन जनतेचे प्रश्न सोईस्करपणे मार्गी लागतील. शेतकरी नेहमीच अडचणीत असतो प्रामाणिकपणे रात्रंदिवस शेतात राबवूनही आर्थिक चणचण त्याचा पिच्छा सोडत नाही. अशा शेतकऱ्यांना दुभती जनावरे मिळवून देण्यासाठी काही करता येईल का ? जिल्ह्यात जिरायत क्षेत्र जास्त आहे . बहुतांश शेतीही पावसाच्या पाण्यावर अवलंबून आहे. बागायती क्षेत्र खूप कमी आहे. पावसाचे पडलेले ८५ टक्केहून अधिक पाणी वाहून जाते आणि समुद्राला मिळते. जिल्ह्यातील अनेक छोट्या–मोठ्या नद्यांमधून वाया जाणारे पाणी आडविण्यासाठी छोटे–मोठे काही पाझर तलाव बांधण्याचे नियोजन करणे शक्य असेल तर या कामाचा पाठपुरावा करणे अपेक्षित आहे. बीडसह जिल्ह्यातील अनेक शहरातील रस्त्यांची अवस्था डर्ट – ट्रॅक स्पर्धेसाठी बनवलेल्या रस्त्यांपेक्षाही वाईट आहे . त्यासाठी काही करता येईल का ? बीड जिल्हा हा ऊसतोड कामगारांचा जिल्हा म्हणून ओळखला जातो . जिल्ह्याची ही ओळख नक्कीच अभिनंदनीय नाही. जिल्ह्याची ही ओळख पुसून टाकण्यासाठी काही उपाय – योजना करता येतील का ? एक संसद सदस्य म्हणून किंवा लोकप्रतिनिधी म्हणून सर्वच गोष्टी आपल्या आखत्यारित येत नाहीत , पण बाप्पा प्रयत्न करायला काय हरकत आहे . असेही डॉ. नंदकुमार उघाडे यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे.

# पान सहा वरून

**केज विधानसभेच्या रिंगणात...**

येत नसल्याच्या तक्रारी आता वाढल्या आहेत. वंजारी,मराठा,मुस्लिम समाजातील दोन चार कार्यकर्ते हाताशी धरायचे म्हणजे सगळा समाज बरोबर आसतो हे मुंदडा कुटुंबाला कधी समजलच नाही.स्वतः मागासवर्गीय म्हणून निवडणूक लढवतात पण यांना दलिताची अलर्जी आहे यांच्या जवळपास एक ही दलित कार्यकर्ता नाही.दोन चार कार्यकर्त्यांना काम द्याचे व बाकी समाज उपाशीच ही मुंदडा कुटुंबाची राजकीय खेळी असते.समाजात जनाधार नसलेले नेते म्हणावरे त्यांच्या बैलगाडीचे सारथ्य करत असतात.त्याना वाटत असत ही बैलगाडी मीच चालवतोय पण लोकसभेतच यांचा फुगा फुटला आहे. गुत्तेदार व प्लॉटींग व्यावसायिक यांचे कार्यकर्ते आहेत. आता लोक पुढे होऊन त्यावर बोलत आहेत.आमदार व त्यांचे कुटुंबीय काही मर्यादित कार्यकर्त्या च्यात गुरफटलेले दिसून आले.ते कधी जनते पर्यंत या कार्यकर्त्यांने पोहचू दिले नाही व आमदारांनी तसे प्रयत्न गेल्या पाच वर्षांत दिसून आले नाहीत.एकूण सगळे वातावरण बघून नविन उमेदवार येथे बाजी मारू शकतो त्याच मुळे उमेदवारांची बाहूगर्दी वाढली आहे.सद्या तरी शरद पवार(राष्ट्रवादी काँग्रेस) गटाचा उमेदवार निवडून येऊ शकतो असे मतदारसंघात वातावरण आहे.

**जुगार अड्ड्यावर पोलिसांचा...**

नवाज पठाण,अयुब मोहम्मद पठाण, शिवा बबन भवरे, नवाब मुन्शी शहा,विठ्ठल पंढरीनाथ नवले ,सचिन आसाराम मोटकर इत्यादींना अटक करून न्यायालयात हजर केले असता मुंबई जुगार प्रतिबंधक कायद्याने वैयक्तिक जातमुचलका वर सोडवण्यात आले. या कारवाईत पोलीस हेड कॉन्स्टेबल राजेश आटोळे ,महेश माळी यांनी जोरदार कामगिरी बजावली.

**अभ्यासतील सातत्यातून...**

शनिवारी सकाळी नायगांव येथील अभिजित महादेव मुजमूले यांची व त्यांच्या आई वडीलांची भेट घेऊन त्यांचा सत्कार करुन अभिनंदन करतांना डॉ. अंजलीताई रामराव घाडगे, राष्ट्रीय काँग्रेसचे तालुकाध्यक्ष प्रविण खोडसे, राहुल खोडसे जिल्हा उपाध्यक्ष संभाजी ब्रिगेड, पत्रकार रंजित घाडगे ग्रामस्थ उपस्थित होते.

**योगासन स्पोर्ट चॅम्पियन...**

उत्कृष्ट सादरीकरण केले .कुमारी सिद्धी जनक थोरात या विद्यार्थिनीने अप्रतिम प्रदर्शन करत जिल्हास्तरावर द्वितीय क्रमांक पटकावलेला आहे आणि १६,१७,१८ ऑगस्ट तारखेला संगमनेर येथे होणाऱ्या राज्यस्तरीय योगासन स्पर्धेसाठी ती पात्र झालेली आहे.या स्पर्धेसाठी योगा प्रशिक्षक श्रीमती , नेहरकर मॅडम यांनी विद्यार्थ्यांची तयारी करून घेतली मुख्याध्यापक श्री अंधारे सर व सर्व स्टाफ शिक्षक यांनी त्यांना सहकार्य केले. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे कौतुक करण्यात येत आहे.

**गेवराई विधानसभा निवडणुक....**

न्याय हक्कासाठी लढणारा, शेतकरी, दिनदुबळ्यांसाठी वेळप्रसंगी रस्त्यावर उतरून न्याय मिळवून देणारा निस्वार्थी भावनेतून जनतेची सेवा करणारे व्यक्तिमत्व, तसेच राजकारण आणि समाजकारणाच्या माध्यमातून जनतेशी थेट संपर्क व त्यांच्याशी सात ला जाणारा संवाद यामुळे सर्व परिचित असणारे सुनील ठोसर हे गेवराई विधानसभा मतदार संघातील जनतेच्या मनातील उमेदवार असलेल्या चर्चेस उधाण आले असल्यामुळे प्रस्थापितांचे धाबे दणाणले आहे. प्रस्थापितांची घराणेशाही मोडी स काढण्यासाठी सुनील ठोसर या नवख्या तरुण नेतृत्वास निवडून देण्याची चर्चा मतदारसंघातील जनतेतून जोरदार सुरू आहे. गेली अनेक वर्ष सामाजिक कार्य करत असताना सर्व जाती धर्मातील अठरापगड जातीच्या युवकांची फळी तयार करून अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराच्या विरुद्ध वेळ प्रसंगी रस्त्यावर उतरून गोरगरीब पीडित जनतेस न्याय देण्याचे काम सुनील ठोसर यांनी वेळोवेळी केले आहे. याच निस्वार्थी जनसेवेमुळे मतदार संघातील जनतेमध्ये त्यांच्या प्रति वेगळीच क्रेझ निर्माण झाली असून सुनील ठोसर हे गेवराई विधानसभा निवडणूक रिंगणात उतरणार असल्यामुळे व मतदार संघातील जनतेचा कौल पाहता प्रस्थापित राजकारणी, तसेच श्रीमंत मराठा, विरुद्ध सर्वसामान्य शेतकरी पुत्र, गरीब मराठा अशीच रंगतदार लढत गेवराई विधानसभा मतदारसंघात पहावयास मिळणार हे निश्चित आहे. संघर्ष योद्धा मनोज दादा जरांगे पाटील यांच्या मराठा आरक्षण लढ्यात प्रकाशाने सहभागी होणारे व मनोज दादा जरांगे पाटील यांचे खंदे समर्थक असल्याने तसेच संघर्ष योद्धा मनोज दादा जरांगे पाटील म्हणतात विधानसभा निवडणुकीत श्रीमंत मराठ्यांना पाडा त्यामुळे सध्या तरी सर्वसामान्य गरीब शेतकरी कुटुंबातून आलेल्या सुनील ठोसर यांच्याच नावाची जोरदार चर्चा जनतेतून ऐकवयास मिळत आहे. तसेच त्यांनी आजपर्यंत गोरगरीबांच्या सेवेत तत्पर राहून न्याय देण्यासाठी झटत आहेत. त्यामुळे अशा गोरगरीब जनतेच्या समस्या सोडविण्यासाठी तसेच न्यायासाठी तडफदार नेतृत्व म्हणून सुनिल ठोसर यांना एकदा संधी देऊन गोरगरिबांच्या सेवेत दाखल करावे अशी चर्चा सध्या सुरू आहे.

**सेवानिवृत्त सैनिकांची घोड्यावर...**

त्यांची ट्रेनिंग संपल्यानंतर पहिली सेवा त्यांची पंजाब येथील भटिंडा येथे झाली तेथे काही काळ सेवा बजावल्यानंतर त्यांची कारगिल येथे बदली झाली २४ वर्षाच्या सेवाकाळात त्यांनी तब्बल १२ वर्ष हा काळ भारतीय सीमेवर घालवला पोखरण व कारगिल येथील त्यांचा सेवाकाळ हा खूप संघर्षमय होता असे त्यांनी सांगितले या मिरवणुकीमध्ये त्यांचे वर्गमित्र कुटुंबातील सर्व सदस्य व गावकरी तसेच सर्व समाज बांधव एकत्रित आल्याने त्यांच्या मिरवणुकीला सोयगाव शहरातील नागरिक उपस्थित होते

**बाकीचे नेते मतदारांना ....**

सावरगाव, हिरापूर, रामगाव, उक्कडगाव, चव्हाणवाडी, खुंड्रस, पाडळसिंगी, बराणपुर, गोविंदवाडी, राजपिंपरी यासह अनेक गावांमध्ये उद्घाटन करण्यात आले आहे. विरोधक मतदारांना विनंती करण्यात त्रस्त तर शिवराज दादा पवार उद्घाटनात व्यस्त अशी चर्चा सध्या तरी मतदारसंघात ऐकायला मिळत आहे.

संपादक : **बाळासाहेब भगवान मस्के**, कार्यकारी संपादक : **सुनिल मसू डोंगरे**

हे दैनिक प्रकाशक,मुद्रक,मालक,संपादक बाळासाहेब भगवान मस्के यांनी बी.एम.प्रिंटर्स अॅन्ड पब्लिकेशन, बीड, ता.जि.बीड येथे छापून दैनिक बीड पुण्यभूमी तहसीलच्यामागे, डीपी रोड बीड (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.
(अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.) न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत दुरध्वनी–०२४४२–२९९०८४,ई–मेल–beedpunyabhumi@gmail.com

Daily Beed punyabhumi hews paper owner, publisher, Edit Balasaheb Bhagwan Maske has printed at B.M. printexs, behing the tehsil, dp road (Maharashtra) 431122
Published at daily Beed Punyabhumi office, behing the tehsil, dp road, beed -431122 Phone No. (02442)299084, Email-beedpunyabhumi@gmail.com

# अखेर आरोग्य केंद्रात बाह्यरुग्ण विभाग सुरु!

## दिलासा : सामाजिक कार्यकर्त्यांच्या आंदोलनाची दखल




बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यातील दासखेड येथील प्राथमिक आरोग्य केंद्र मुख्य इमारतीसाठी २ कोटी ६३ लाख आणि कुसळंब प्राथमिक आरोग्य केंद्र मुख्य इमारत आणि वैद्यकीय अधिकारी आणि कर्मचारी यांच्या निवासस्थाना साठी ६ कोटी ३१ लाख रुपये खर्चून सर्व सोयींनी युक्त आरोग्य केंद्र बांधण्यात आली होती.मात्र २ वर्षांपासून बांधकाम पूर्ण झालेले असतानाही शासनाच्या लालफितीत आणि लोकप्रतिनिधींनी दुर्लक्ष केल्याने उद्घाटनाच्या प्रतीक्षेत होते. मात्र पंचक्रोशीतील गोरगरीब, कष्टकरी आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकातील रूग्णांची हेळसांड होत असुन त्यांना आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत असुन याबाबत सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी प्राथमिक आरोग्य केंद्रे तातडीने सुरू करण्यात यावीत यासाठी दि.१५ ऑगस्ट आगस्ट रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन करण्यात येणार असल्याचे निवेदन डॉ.सरिता हजारे सहसंचालक आरोग्य सेवा (प्राआकें/उपकेंद्र/दवाखाने) मुंबई यांनी घेत जिल्हा आरोग्य आधिकारी बीड डॉ.उल्हास गंडाळ यांना दिले होते. त्या अनुषंगाने डॉ. उल्हास गंडाळ यांच्या आदेशाने दि.१ ऑगस्ट पासुन दासखेड आणि कुसळंब येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात बाह्यरुग्ण विभाग सुरू करण्यात आला असुन रूग्णांची गैरसोय दूर झाली असुन पाटोदा येथे उपचारासाठी आर्थिक भुर्दंड सहन करावा लागणार नाही.

दासखेड येथील भुमिपुत्र कृष्णा जाधव हे मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे यांचे विश्वासू अधिकारी असुन एकनाथ शिंदे आरोग्यमंत्री असताना कृष्णा जाधव ओ.एस.डी. म्हणून काम पहात होते.त्यांच्या प्रयत्नांमुळे दासखेड येथे प्राथमिक आरोग्य केंद्र मंजूर करण्यात येऊन २ कोटी ६३ लाख खर्चून ईमारत बांधण्यात आली मात्र २ वर्षांपासून आरोग्य सुविधा सुरू नव्हती.आता आरोग्य सुविधा सुरू झाल्याने पंचक्रोशीतील रूग्णांची हेळसांड थांबणार आहे. याठिकाणी पिण्याच्या पाण्याची आणि विजेची सोय नाही तेवढ्या त्रुटी आरोग्य विभागाने दुर कराव्यात.

### आरोग्य सुविधा सुरू:डॉ.गणेश ढवळे

दासखेड येथील प्राथमिक आरोग्य केंद्र तब्बल २ कोटी ६३ लाग रूपये खर्चून मुख्य ईमारत सर्व सोयींनी युक्त बांधण्यात आली होती.मात्र २ वर्षांपासून शासनाच्या लालफितीत आणि लोकप्रतिनिधींनी दुर्लक्ष केल्याने उद्घाटनाच्या प्रतीक्षेत होते. संबधित प्रकरणी १५ ऑगस्ट रोजी आंदोलनाचा ईशारा दिल्यानंतर डॉ.सारिका हजारे सहसंचालक आरोग्यसेवा ( प्राआकें/ उपकेंद्र/दवाखाने) मुंबई यांनी निवेदनाची दखल घेऊन प्राथमिक आरोग्य केंद्र सुरू करण्याच्या सुचना दिल्यानंतर डॉ.उल्हास गंडाळ यांच्या आदेशाने दासखेड आणि कुसळंब येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात बाह्यरुग्ण सेवा सुरू करण्यात आली असुन वैद्यकीय अधिकारी डॉ.शरयु पडोळे कार्यरत असुन रूग्णांना आरोग्य सेवा देत आहेत.

# लक्ष्मणबुवा बन यांची पुण्यतिथी



बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड शहराचे ग्रामदैवत असलेल्या श्री तुळजाभवानी खासबाग देवी मंदिराचे पुजारी लक्ष्मणबुवा बन महाराज यांची दुसरी पुण्यतिथी दिनांक एक ऑगस्ट २०२४ रोजी साजरी तिथीप्रमाणे साजरी करण्यात आली. लक्ष्मणबुवा बन महाराज यांचे बीड शहरासह ग्रामीण भागामध्ये बरेच शिष्यगण आहेत. त्यांनी त्यांच्या हयातीत खासबाग देवी मंदिराचे पुजारी म्हणून पन्नास वर्षे निष्ठेने सेवा केली. दोन वर्षे पूर्वी ७४ वय असताना त्यांच्या अचानक अकाली निधन झाले होते . आजही अनेक देवी भक्तांच्या त्यांच्या जाण्याने दुःख वेदना जाणवतात. दुसऱ्या पुण्यतिथीनिमित्त बीड शहरातील देवीभक्ता सह त्यांचे शिष्य मंडळी सह नातेवाईक यांनी उपस्थित राहून आदरांजली वाहिली.

यावेळी चिरंजीव मच्छिंद्र बन महाराज सांगितले की यापुढील त्यांची पुण्यतिथी धार्मिक व सामाजिक उपकरणासह साजरी करण्यात येईल. यावेळी आदरांजली वाहण्यासाठी माजी आमदार सुनील धांडे, देवी विश्वस्त मंडळाचे अध्यक्ष दिनकरराव कदम, सचिव शरद घायाळ, मंगल ताई मोरे , पत्रकार रवी उबाळे ,अमोल चौरे , झुंजार धांडे , अंबादास नवले , पिंटू माने , कैलास शेजाळ, गणेश गरुड , विनोद धांडे, गंगाधर पुरी, ओमप्रकाश गिरी, अनिल गिरी नाना पर्वत , पोपट गोसावी, शिवाजी गिरी (पुणे) दिगंबर गिरी संतोष गिरी ,नारायण महाराज गिरी, विलासबुवा जोशी, राम पुरी, अंबादास गिरी, त्यांचे मुली जावई नातेवाईक शिष्यगण इत्यादी सह मोठ्या संख्येने उपस्थित होते

# निष्ठेने केलेले कर्म म्हणजेच धर्म : मोहन महाराज खरमाटे

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

येथील नियोजित श्री संत सावता महाराज मंदिर (सावता माळी चौक) समाजाच्या वतीने पुण्यतिथीचा कार्यक्रम संपन्न झाला विविध कार्यक्रम या निमित्ताने येथे झाले. सकाळी साडेनऊ वाजता श्री संत सावता महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन सकल माळी समाजाच्या वतीने करण्यात आले. सावता परिषदेचे संस्थापक अध्यक्ष आणि राष्ट्रवादी काँग्रेस ओबीसी सेलचे प्रदेशाध्यक्ष कल्याणकाका आखाडे यांचे हस्ते मुख्य आरतीचा कार्यक्रम झाला. नंतर लगेचच प्रवचनकार ह.भ. प. मोहन महाराज खरमाटे यांचे प्रवचन झाले. प्रवचनात त्यांनी श्री सावता महाराजांच्या काही अभंगांचे निरूपण केले. ते म्हणाले की माझे सगळ्यात आवडते संत सावता महाराज आहेत. सावता बाबांच्या संपूर्ण चरित्राचा निष्कर्ष काय निघत असेल तर तो म्हणजे आपल्या वाट्याला आलेले कर्म लोकहितकारक, निष्ठेने करत राहवे आणि हाच खरा धर्म आहे. त्यांनी कर्मकांड,जप,यज्ञ यामध्ये वेळ घातला नाही तर आपले दैनंदिन कर्म करत परमेश्वराचे नामस्मरण केले. चांगल्या कर्मात एवढी ताकद आहे की देवाला सुद्धा सावताच्या मळ्यात यावे लागले. सावता महाराज आयुर्वेदाचे महाज्ञानी होते. औषधी वनस्पतींचे ते संशोधक होते अनेकांचे आरोग्य त्यांनी चांगले केले असे सांगून महाराज म्हणाले की कोणीही जातीने श्रेष्ठ किंवा कनिष्ठ नसतो तर सर्वांची जात माणूस हीच आहे,हा सावता बाबांचा संदेश सर्वांनी स्वीकारला पाहिजे.आजच्या परिस्थितीत या संदेशाची गरज अधिक आहे असेही ते म्हणाले. यावेळी महाराजांनी मंदिर बांधकामासाठी स्वखुशीने २२२१ रुपयाची देणगी रोख स्वरूपात दिली

प्रारंभी ह. भ. प.खरमाटे महाराज आणि उपस्थिताचे स्वागत, सत्कार ट्रस्टच्या वतीने आणि सकल माळी समाज बांधवांच्या वतीने श्री मोहनराव गोरे यांनी केले.

कु. हर्षदा शिवाजी सोणके या मुलीचा नीट परीक्षेमधून एमबीबीएस ला प्रवेश निश्चित झाला आहे त्याबद्दल पुष्पगुच्छ आणि स्मृतिचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक आणि सूत्रसंचालन प्रा. लक्ष्मण गुंजाळ यांनी केले. कार्यक्रमास नामदेवराव दुधाळ, डॉ. सुधाकर राऊत ,विश्वंभरराव काळे, न.प.सदस्य विशाल घाडगे, रमेश दुधाळ, किशोर जवंजाळ, प्रा. एम के राऊत,भागवत शिंदे पी आर दुधाळ, नितीन साखरे, गोरख यादव,अंकुशराव शेलार, बाबासाहेब मनेरी पाटील, प्राचार्य नामदेवराव काळे, सचिन दुधाळ, संतराम पानखडे, श्रीकृष्ण खेत्रे, निलेश घाडगे, बाळासाहेब धोत्रे, निखिल शिंदे, नितीन राऊत, ऋषी राऊत, रवींद्र घाडगे, संतोष गवळी, शिवाजी सोनके, अंबादास घोडके इत्यादी असंख्य समाज बांधवांची उपस्थिती यावेळी होती. महाप्रसादानंतर कार्यक्रमाची सांगता झाली.

# संत सावता माळींचा जिवनपट उलगडला

## आध्यत्मिक : मोठेवाडीत पुण्यतिथी सोहळा



गंगामसला/पुण्यभूमी प्रतिनिधी

कांदा–मुळा भाजी अवघी,विठाई माझी, मोटविहरी दोरी, अवघी व्यापिली पंढरी! लसूण, मिरची कोथंबबिरी,अवघा झाला माझा श्रीहरी' हा अंभग म्हणत हभप बाळु महाराज उगले यांनी संतशिरोमणी सावता माळी यांचा जिवनपट कीर्तनाच्या माध्यमातुन उलगडला.

माजलगाव तालुक्यातील मोठेवाडी येथील नव्याने स्थापना केलेल्या संत सावता माळी मंदिरात संत शिरोमणी सावता महाराज पुण्यतिथी सोहळ्या निमित्ताने किर्तन, भजन व महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.

किर्तनरूपी सेवेचे निरोपण प्रसंगी उगले महाराज म्हणाले की, आपल्या दैनदिन जीवनाच्या कामाच्या अनुभवातून देवाची भक्ती करू पहात संत सावता माळी जाती– जातीतुन भगवद्भक्तीचा गंध फुलवत होते.ज्ञानदेव, नामदेवांच्या काळात सावता बाबा आपल्या रोजच्या उद्योगाला हरिभक्ती समजून त्यात पुर्णपणे रंगुन गेले होते. पूर्णवेळ बागकाम करणारे सावताबाबा आपल्या नित्य उद्योगात रत होऊन जात आणि चित्तात भगवंताचे स्मरण ठेवत.देव सदासर्वकाळ तुमच्या सान्निध्यात वसतो, तत्व त्यांनी आपल्या आयुष्य भराच्या व्यवहाराने सामान्य जनांच्या मनावर ठसवले. असे अनेक दाखले देऊन सावताबाबा यांचा जिवनपट उगले महाराजांनी आपल्या किर्तनातून उलगडला. या किर्तनरूपी सेवेत हभप मृदंगाचार्य राम महाराज गायकवाड,गणेश महाराज वाघमारे,राजेभाऊ महाराज गात व गावातील भजनी मंडळ यांनी साथ दिली.

किर्तनानंतर महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. यावेळी पंचक्रोशीतील भाविक भक्तांनी सावताबाबा यांच्या दर्शनाचा व महाप्रसादाचा लाभ घेतला. कार्यक्रम चैतन्यदायी करण्यासाठी समस्त ग्रामस्थांनी परिश्रम घेतले.

# आरक्षण बचाव यात्रेचे निमंत्रण

## सिद्धार्थ मोकळे : वंचितकडून मंडल दिन



मुंबई/पुण्यभूमी प्रतिनिधी

वंचित बहुजन आघाडीची राज्यभर आरक्षण बचाव यात्रा सुरू आहे. या यात्रेची समारोप सभा औरंगाबाद येथे ७ ऑगस्ट रोजी होणार आहे. त्या निमित्ताने महाविकास आघाडीकडून शरद पवार, बाळासाहेब थोरात आणि अमोल कोल्हे तसेच महायुतीकडून छगन भुजबळ, पंकजा मुंडे आणि धनंजय मुंडे यांना आम्ही मंडल दिनासाठी आमंत्रित केल्याची माहिती वंचित बहुजन आघाडीचे मुख्य प्रवक्ते सिद्धार्थ मोकळे यांनी मुंबई येथील पत्रकार परिषदेत दिली.

सिद्धार्थ मोकळे म्हणाले की, ७ ऑगस्ट हा दिवस 'मंडल दिन' म्हणून साजरा करण्याचा निर्णय वंचित बहुजन आघाडीने घेतला आहे. ७ ऑगस्ट २०२४ पासून वंचित बहुजन आघाडी दरवर्षी 'मंडल दिन' साजरा करेल. ७ ऑगस्ट १९९० रोजी मंडल आयोगाच्या शिफारशी लागू करण्याचा निर्णय घोषित झाला होता.

मनोज जरांगे यांना बाळासाहेब आंबेडकर हे भेटायला गेले होते, तेव्हा बाळासाहेब आंबेडकरांनी भूमिका स्पष्ट केली होती की, मराठा समाजाला आरक्षण मिळायला पाहिजे. मात्र, मराठा आरक्षणाचे ताट वेगळे आणि ओबीसी आरक्षणाचे ताट वेगळे असले पाहिजे. असेही मोकळे यांनी म्हटले आहे.वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ड. प्रकाश आंबेडकर यांच्या नेतृत्वात आरक्षण बचाव यात्रा काढण्यात आलेली आहे. यामध्ये विविध ओबीसी संघटना, त्या संघटनांचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी होत आहे. ७ ऑगस्ट रोजी औरंगाबाद येथे या यात्रेचा समारोप कार्यक्रम होणार आहे. या पार्श्वभूमीवर वंचित बहुजन आघाडीने राजकीय पक्षातील काही नेत्यांना निमंत्रण दिले आहे.

# केजमध्ये भगवा सप्ताह

केज/पुण्यभूमी प्रतिनिधी



शिवसेना पक्षप्रमुख माजी मुख्यमंत्री माननीय उद्धवजी ठाकरे साहेब यांच्या आदेशावरून दिनांक ४ ऑगस्ट ते ११ ऑगस्ट २०२४ या कालावधीत भगवा सप्ताहाचे आयोजन शिवसेना नेते आमदार सुनीलजी प्रभू साहेब मराठवाडा समन्वयक उपनेते विश्वनाथ नेरूरकर साहेब उपनेत्या माननीय सुषमाताई अंधारे लोकसभा प्रमुख माजी आमदार सुनील दादा धांडे सहसंपर्कप्रमुख बाळासाहेब अंबुरे यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा प्रमुख रत्नाकर शिंदे यांच्या नेतृत्वाखाली केज विधानसभा व परळी विधानसभा मतदारसंघात करण्यात आले आहे.सदरील भगवा सप्ताहात शिवसेना प्राथमिक सदस्य नोंदणी अभियान,शिवसेना शाखा उद्घाटन सोहळा,बुथ प्रमुख गट प्रमुख शाखाप्रमुख मेळावे, नवीन मतदार नोंदणी,सह शिवसेना आपल्या दारी अभियान जेष्ठ शिवसैनिक सत्कार विविध प्रश्नांवर आंदोलन सह अनेक सामाजिक कार्यक्रम आयोजित करून भगवा सप्ताहात राबविण्यात येणार आहेत, येणाऱ्या विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर गाव तिथे शाखा व घर तिथे शिवसैनिक तयार करून, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाची ताकद दाखवण्यासाठी मैदानात उतरून पुन्हा एकदा उद्धव साहेबांना मुख्यमंत्री करण्यासाठी अहोरात्र मेहनत घेणार असे जिल्हा प्रमुख रत्नाकर शिंदे यांनी माहिती दिली आहे.

# भाजपला सोडण्याची वेळ का?

## पडघम : संगिता ठोंबरेंकडून तुतारी वाजवनार नाही?



केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

भारतीय जनता पार्टीचे माजी आमदार असताना संगीता ठोंबरे यांच्यावर ही वेळ का आली आज राष्ट्रवादी शरदचंद्रजी पवार यांचे विश्वासू ,राष्ट्रवादीचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष यांची आज माजी आमदार भारतीय जनता पार्टी च्या माध्यमातून केज विधानसभा च्या तिकिटावर दावा सांगणाऱ्या, संगीता ताई ठोंबरे यांनी जवळजवळ राष्ट्रवादीच्या पक्ष कार्यालयामध्ये, दीड तास सखोल चर्चा केल्याने ,केज विधानसभेत पृथ्वीराज साठे यांची धाकधूक वाढली असून, यांच्यासह अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत.

केज विधानसभेची रणधुमाळी अवघ्या दोन ते तीन महिन्याच्या वर आली असल्याने, निवडणुकीच्या बोहल्यावर चढणाऱ्यांची रस्सीखेच सुरू असताना, पाहायला मिळत आहे. याच अनुषंगाने भारतीय जनता पार्टीच्या तिकिटावर सबळ दावेदार मीच आहे. असे पत्रकार परिषद घेऊन सांगणाऱ्या संगीताताई ठोंबरे , शरदचंद्रजी पवार राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांच्यात दीड तास चाललेल्या चर्चेला उधाण आले असून, इकडे मात्र शरदचंद्रजी पवार यांचे खरे दावेदार माजी आमदार पृथ्वीराज साठे यांची मात्र धाकधूक वाढली असून, संगीता ताई ठोंबरे या भारतीय जनता पार्टीच्या माजी आमदार असून, यांच्यावर जयंत पाटील यांच्याशी भेट घेऊन दीड तास चर्चा करण्याची का वेळ आली. हाच विषय घेऊन, केज व आंबेजोगाई मतदार संघात जाणकार नागरिकात चवीने चर्चा होत आहे

## सक्सेस : विद्यार्थी भारत सरकारच्या शिष्यवृत्तीस पात्र

# आदित्य महाविद्यालयाची गगन भरारी!





बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

आदित्य शिक्षण संस्थेत विद्यार्थ्यांना पुस्तकी ज्ञानाबरोबर भविष्यात त्यांना उपयोगी पडणारे विविध उपक्रम सातत्याने राबवले जातात. वेगवेगळ्या परिक्षांबदल येथे मार्गदर्शन मिळते. त्यामुळे येथील विद्यार्थी आज विविध क्षेत्रात गगनभरारी घेत आहेत. भारत सरकारच्या शिक्षा मंत्रालयाच्या निर्देशानुसार फार्मसी क्षेत्रातील एम. फार्म व तत्सम इतर उच्च शिक्षणाकरिता राष्ट्रीय स्तरावर ऋझ–ढ ही परीक्षा महत्त्वाची तसेच अनिवार्य आहे. भारत सरकारच्या नॅशनल बोर्ड एक्झामिनेशन्स इन मेडिकल सायन्सेस यांच्याद्वारे घेतल्या जाणाऱ्या ह्या परीक्षेत पात्र ठरणाऱ्या विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी भारत सरकार तर्फे दरमहा १२ हजार ५०० रूपये शिष्यवृत्ती देण्यात येते. या शिक्षवृत्तीसाठी आदित्य शिक्षण संस्थेचे विद्यार्थी पात्र ठरले आहेत.

आदित्य शिक्षण संस्थेतील फार्मसी महाविद्यालयाचे तब्बल १७ विद्यार्थी जीपीएट– २०२४ या परीक्षेत १०० पेक्षा अधिक गुण घेऊन यशस्वी झालेले आहेत. त्यापैकी जयदीप नागणे व प्रथमेश परकळे हे दोन विद्यार्थी भारत सरकार तर्फे फार्मसी क्षेत्रातील उच्च शिक्षणाकरिता दिल्या जाणाऱ्या शिष्यवृत्तीसाठी पात्र ठरले आहेत. संस्थेचे संचालक डॉ. आदित्य सारडा यांच्या हस्ते सर्व विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. तर संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्रजी सारडा आणि वसंतराव नाईक कृषी विद्यापीठ परभणी च्या कार्यकारी सदस्या तसेच आदित्य शिक्षण संस्थेच्या संचालीका डॉ. आदीती सारडा यांनी संस्थेत राबवण्यात येत असलेल्या विविध उपक्रमाचे आणि विद्यार्थ्यांच्या यशाचे कौतूक केले. याच वर्षी नायपर–जेईई २०२४ या राष्ट्रीय स्तरावरील महत्त्वाच्या परीक्षेतही संस्थेच्या फार्मसी महाविद्यालयाच्या पाच विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश प्राप्त केलेले आहे. आदित्य शिक्षण संस्थेत प्राचार्य डॉ. संतोष जैन, डॉ. प्राची उदापूरकर तसेच फार्मसी विभागाच्या सर्व प्राध्यापकांच्या विशेष प्रयत्नातून महाविद्यालयात विद्यार्थ्यांना ऋझ–ढ/छखझएठ सारख्या स्पर्धा परीक्षेच्या तयारी करिता विशेष मार्गदर्शन व सराव परीक्षा घेतल्या जातात.

### यश हाच शिक्षकांचा सन्मान:डॉ.आदित्य सारडा

आदित्य शिक्षण संस्थेतील प्रत्येक विद्यार्थ्यांमधील क्षमता ओळखून त्यांच्यातील कला गुणांना वाव देण्याचे काम येथील प्राध्यापक करत आहेत. त्यामुळे आज एकही क्षेत्र नाही तिथे आदित्य शिक्षण संस्थेचा विद्यार्थी नाही. प्रत्यक क्षेत्रात आदित्य शिक्षण संस्थेच्या विद्यार्थ्यांनी गगनभरारी घेतली आहे. संस्थेतील विद्यार्थी राष्ट्रीय पातळीवर चमकदार कामगिरी करीत आहेत. विद्यार्थ्यांनी मिळवलेले यश हाच सर्वात मोठा शिक्षकांचा सन्मान असतो असे मत आदित्य शिक्षण संस्थेचे संचालक डॉ.आदित्य सारडा यांनी व्यक्त केले.

# रविशंकर विद्या मंदिरमध्ये अभिवादन

## नियोजन : टिळक पुण्यतिथी, साठे जयंतीचे अभिवादन



बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

श्री श्री रविशंकर बाल मंदिर, आदर्श नगर व श्री श्री रविशंकर विद्यामंदिर पिंपरगव्हाण रोड बीड येथे दिनांक १ ऑगस्ट २०२४ वार गुरुवार रोजी लोकमान्य टिळक यांची पुण्यतिथी व लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीच्या निमित्ताने अभिवादन मान्यवरांच्या उपस्थितीत प्रतिमा पुजन करुन करण्यात आले यावेळी संस्थेचे अध्यक्ष श्री जैन सर, संस्थेचे सचिव श्री पारगावकर सर, शाळेचे मुख्याध्यापक श्री हंसेसर, शाळेच्या उपमुख्याध्यापिका अनिता सूर्यवंशी मॅडम यांच्या हस्ते लोकमान्य टिळक आणि अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमांचे पुजन करण्यात आले.

उपमुख्यध्यापिका अनिता सुर्यवंशी मॅडम म्हणाल्या की, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे हे समाज सुधारक तर होतेच तर ते श्रेष्ठ साहित्यकार ,लेखक ,कादंबरीकार देखील होते त्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांचा पोवाडा रशियाच्या कानाकोपर्यात पोहोंचविला तसेच लोकशाहीर म्हणजेच अण्णाभाऊ साठे त्यांचा लेखणीचा वसा विद्यार्थ्यांनीही पुढे चालू ठेवावा व मराठी साहित्य समृद्ध करावे असे त्या म्हणाल्या. त्यानंतर सुषमा हावळे मॅडम यांनी अण्णाभाऊ साठे यांचा जीवन परिचय आपल्या भाषणातून करून दिला. तसेच विद्यार्थ्यांना अण्णाभाऊ साठे यांचा जीवनपट दर्शविणारी चित्रफित दाखविण्यात आली. आपल्या मनोगतामध्ये या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन इयत्ता पहिलीतील श्रावणी भोंडवे या विद्यार्थिनीने उत्कृष्टपणे केले. तर अमृता देशपांडे मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी या कार्यक्रमाचे सुयोग्य असे नियोजन केले. व हा कार्यक्रम यशस्वीपणे पार पडला.

# संस्कारक्षम माता



सिंधुताईंनी अनेक अनाथ लेकरांना आपल्या पोटाशी धरून, भुकेचा घास मिळवून दिला. अनाथ मुलांना सांभाळून, त्यांना संस्कारक्षम बनवून त्यांच्या जीवनाला दिशा देण्यासाठी, सिंधुताई यांनी 'ममता बाल सदन' या संस्थेची स्थापना १९९४ मध्ये पुण्याजवळ पुरंदर तालुक्यात कुंभारवळण या गावी सुरू केली.



ओंजळ

**पल्लवी अष्टेकर**

कोकणातील पालगड या रत्नागिरीजवळील गावात २४ डिसेंबर १८९९ रोजी साने गुरूजी उर्फ श्यामचा जन्म झाला. श्यामच्या आईचे नाव यशोदाबाई असे होते. श्याम उर्फ पंढरी हा यशोदाबाईंचा तिसरा मुलगा होता. श्यामची आई ही झाडा-माडांवर, मुक्या जीवांवर प्रेम करणारी एक मृदू मनाची माता होती.

कोकणातील पालगड या गावी हे कुटुंब राहायचे. साने गुरूजींच्या बालपणात हे कुटुंब चांगले सुखवस्तू होते; परंतु नंतर त्यांची आर्थिक स्थिती खालावत गेली. श्यामचे खरे नाव पांडुरंग. त्याची आई प्रेमाने त्याला 'श्याम' म्हणायची. श्यामचे वडील गावातील शेतसारा वसूल करून, सरकारकडे जमा करण्याचे काम करायचे. या शेतसाऱ्याचा ठरावीक हिस्सा खोतांना मिळायचा. श्यामचे कुटुंब आधी एकत्र होते; परंतु पुढे सारे विभक्त झाले. श्यामच्या आईने आपल्या मुलांवर चांगले संस्कार केले. तिने आपल्या मुलांना श्लोक, ओव्या, अभंग शिकविले. परमेश्वराची भक्ती करावी, चोरी करू नये, खोटे बोलू नये, दुसऱ्यांना होईल तेवढी मदत करावी, निसर्गावर प्रेम करावे, कोणाशी भांडू नये, सर्वांवर प्रेम करावे या गोष्टी तिने आपल्या मुलांना शिकवल्या. पंढरी लहान असताना, त्याची आई त्याला सूर्याला व समुद्राला अर्घ्य देण्यास सांगायची. पंढरीला सर्व काही यावे, असे आईला वाटे. त्याच्या सर्व मित्रांना पोहायला यायचे; पण पंढरीला मात्र पाण्याची खूप भीती वाटायची. त्यामुळे तो पोहायला जाईना. त्यामुळे त्याला त्याचे मित्र भित्रा म्हणून चिडवायचे. एकदा पंढरीच्या आईने त्याच्या मित्रांना त्याला घेऊन पोहायला जायला सांगितले. तिला पंढरी धान्याच्या कणगीमागे लपून बसलेला दिसला, तिने त्याला बाहेर ओढून बदडून काढले. ती त्याला घेऊन मुलांसमवेत विहिरीकडे आली व तिने पंढरीला विहिरीत ढकलून दिले. सुरुवातीला पंढरी घाबरला; पण हळूहळू हात-पाय हलवायला लागला. आता त्याची भीती कमी झाली व पोहणे जमू लागले. त्याचे मित्र त्याच्या आईला सांगत आले की, 'पंढरी पोहायला शिकला.' आईने पंढरीला प्रेमाने जवळ घेतले. श्यामच्या वडिलांना खोतीची मिळकत उरली नाही, त्यामुळे श्रीमंती जाऊन गरिबी आली. श्याम अतिशय तीव्र बुद्धिमत्तेचा मुलगा होता. त्याचे प्राथमिक शिक्षण धुळे जिल्ह्यातील शिंदखेडा तालुक्यातील दौडाई येथे झाले.

प्राथमिक शिक्षणानंतर पंढरीला पुढील शिक्षणासाठी पुण्याला मामाकडे पाठविण्यात आले; परंतु पुण्यात त्याचे मन रमत नव्हते म्हणून त्याच्या मामाने पुन्हा त्याला पालगडला पाठविले.

जेव्हा पंढरी घरी परत आला, तेव्हा त्याची एकुलती एक बहीण माहेरी आली होती. ती फार आजारी होती. तिला एक लहान मुलगी होती. आजोबा आपल्या नातीवर वैद्यकीय उपचार करत होते, तेव्हा आईने त्या लहान पोरीला सांभाळण्याचे काम पंढरीवर सोपवले. तो तिला सांभाळताना टंगळ-मंगळ करायचा.

ती मुलगी रडायची. आईला त्याचा राग आला. ती म्हणाली, "माझी मुलगी तापाने फणफणत असताना, मी घरात काबाडकष्ट करून, तिची सुश्रुषा करते आहे; पण हा तिला सांभाळण्याचे काम करीत नाही. मी एकटी काय काय करू? या पोराचा काही उपयोग नाही."

पंढरीने आईचे हे बोलणे ऐकले व त्याला आपल्या वागण्याचे खूप दुःख झाले. आपली आई सतत कष्ट करते, मात्र आपण तिला मदत करत नाही, याचे त्याला खूप वाईट वाटले. त्याने आईची क्षमा मागितली व या पुढे मी चुकीचे वागणार नाही, आक्काच्या मुलीची काळजी घेईन, असे आईला सांगितले. दुसऱ्यांना मदत करणे, हे जीवनातील मोठे कर्तव्य आहे, ही शिकवण त्याला या प्रसंगातून मिळाली. पुढे श्यामची आई देवाघरी गेली. श्याम उर्फ साने गुरूजींनी लिहिलेले 'श्यामची आई' हे पुस्तक अजरामर आहे.

अनाथ मुलांची माय चिंधी उर्फ सिंधुताई सपकाळ यांचा जन्म १४ नोव्हेंबर १९४७ रोजी नवरगाव, वर्धा, महाराष्ट्र येथे झाला. त्यांच्या जन्मानंतर त्यांचे नाव चिंधी (अर्थात फाटलेल्या कपड्याचा तुकडा) असे ठेवण्यात आले. मात्र ही चिंधी पुढे फाटक्या ठिगळांना जोडणारी झाली. सिंधुताई सपकाळ यांच्या वडिलांचे नाव अभिमान साठे. ते गुरं राखायचं काम करायचे. गावात शिक्षणाचा कुणाला गंध नाही, शहरी सुविधांचा स्पर्श नाही. सिंधुताईंच्या आई-वडिलांना सिंधू ही मोठी मुलगी. पाठी एक भाऊ व एक बहीण. त्या पाच वर्षांच्या असताना, त्यांचे वडील त्यांना पिंपरीमधी गावात घेऊन आले. सिंधुताई मुळातच बुद्धिमान, धाडसी. पण परिस्थितीमुळे त्यांना जेमतेम मराठी चौथीपर्यंत शिकता आले. अल्पवयातच त्यांचा विवाह वयाच्या ९ व्या वर्षी वयाने २६ वर्षांनी मोठे असलेल्या श्रीहरी सपकाळ यांच्याशी झाला. सिंधुताईंना सासरी ढोरासारखी मेहनत करावी लागे. त्यांच्या घरात सारे पुस्तकद्वेष्टे होते. सिंधुताई जंगलात लाकूडफाटा, शेण गोळा करताना सापडलेले कागदाचे तुकडे त्या घरी आणायच्या व उंदराच्या बिळात लपवून ठेवायच्या व क्वचित घरी एकट्या असल्या, तर अक्षरांवरून नजर फिरवायच्या.

सिंधुताईंच्या आयुष्यात पावलोपावली संघर्षाचे प्रसंग आले; परंतु परिस्थितीनुसार त्या त्यावर मात करत आल्या. चारित्र्याच्या संशयावरून त्यांच्या पतीने पूर्ण दिवस भरलेल्या सिंधुताईंना बेदम मारून घराबाहेर काढलं व त्यांना गोठ्यात आणून टाकलं. अशा अवस्थेत त्यांची कन्या ममता जन्माला आली. नवऱ्याने हाकलल्यानंतर त्यांना गावकऱ्यांनी हाकललं. नवऱ्याच्या माराने अर्धमेल्या झालेल्या सिंधुताई माहेरी आल्या; पण त्यांच्या सख्ख्या आईनेही पाठ फिरवली.

दोन घासांसाठी भीक मागण्याची वेळ सिंधुताईंवर आली. आपल्या मुलीला, ममताला घेऊन त्या परभणी, नांदेड, मनमाड स्टेशनवर भीक मागत फिरायच्या. कितीही खडतर, कठीण परीक्षा बघणाऱ्या गोष्टी घडोत, सिंधुताईंचा प्रवास चालूच राहिला. अनेक अनाथ लेकरांना आपल्या पोटाशी धरून, भुकेचा घास मिळवून दिला. अनाथ मुलांना सांभाळून, त्यांना संस्कारक्षम बनवून त्यांच्या जीवनाला दिशा देण्यासाठी, सिंधुताई यांनी 'ममता बाल सदन' या संस्थेची स्थापना १९९४ मध्ये पुण्याजवळ पुरंदर तालुक्यात कुंभारवळण या गावी सुरू केली. आपली लेक ममता हिला त्यांनी दगडूशेठ हलवाई संस्थेच्या माध्यमातून शिक्षणासाठी सेवासदन इथे दाखल केले आणि त्यांनी इतर अनाथ व बेवारस मुलांना आधार दिला. लहान मुलांना तिथे आधार दिला जातो. लहान मुलांना सर्व शिक्षण दिले जाते. त्यांच्या जेवण, कपडे यांची सोय संस्थेकडून केली जाते. अशी एकूण १०५० मुले संस्थेत राहिलेली आहेत. अनाथ लेकरांना केवळ निवारा किंवा मायेची सावली देऊन उपयोग नाही, तर ती स्वतःच्या पायावर ताठ कण्याने, कणखरपणाने उभी राहिली पाहिजेत, याकडे सिंधुताईंचा कल होता. त्यासाठी सिंधुताईंनी वसतिगृहे उभारली. अनाथ मुलांवर प्रेमाची पाखर घातली व त्यांना संस्कारक्षम बनविले. गाईंच्या संगोपनासाठी वर्धा येथे गोशाळा उभारली.

सिंधुताईंच्या या अतुलनीय कार्याबद्दल त्यांना 'पद्मश्री' हा सन्मान प्राप्त झाला. त्यांनी 'मी वनवासी' हे आत्मचरित्र लिहिले. त्यांनी आपल्या कार्यासाठी निधी संकलन करण्याच्या हेतूने प्रदेश दौरे केले व आपल्या वाणीने, काव्याने समाजाला प्रभावित केले. दिनांक ४ जानेवारी २०२२ रोजी हृदयविकाराच्या झटक्याने त्यांचे निधन झाले.

सिंधुताईंबद्दल मला एवढेच म्हणावेसे वाटते की,

'प्रेमस्वरूप आई, वासल्यसिंधू आई'
बोलावू तुज आता मी कोणत्या उपायी'.

# 'विठ्ठला कोणता झेंडा घेऊ हाती...'

जसे हिंदीत 'शोले'चे स्थान आहे, तसे मराठीत 'सिंहासन'चे आहे, असे म्हणता येईल. शोले गुन्हेगारी कथेवर असला, तरी त्याने मानवी जीवनातील अनेक अंगांना स्पर्श केला. 'सिंहासन' हा अरुण साधूंच्या कादंबऱ्यांवर बेतलेला आणि जब्बार पटेल यांनी दिग्दर्शित केलेला मराठीतला शोलेच म्हटला पाहिजे. अर्थात सिंहासनचा विषय राजकारण होता. त्यामुळे त्याचा शोलेशी काहीही संबंध नाही, तुलना करता येणार नाही; पण सिनेनिर्मितीचा दर्जा आणि यश यांबाबत दोघांत साम्य होते. मराठीत राजकीय विषयावर जे चित्रपट आले, त्यात क्वचितच गांभीर्य दिसायचे. राजकारणाचे अत्यंत सवंग आकलन, राजकारणी लोकांचे एकांगी चित्रण आणि कसेही करून त्यांना तमाशाच्या फडावर घेऊन जाण्याचा दिग्दर्शकाचा अट्टहास म्हणजे मराठी राजकीय सिनेमा अशी व्याख्या झाली होती. तसा श्रावणी देवधर यांचा १९९८ साली आलेला 'सरकारनामा' खूपच उजवा होता; पण त्याने 'सिंहासन'चे सिंहासन हलवले नाही.

अलीकडे म्हणजे तरीही १४ वर्षांपूर्वी, 'झेंडा' नावाचा चित्रपट संगीतकार अवधूत गुप्ते यांनी केला होता. मुंबईतील मराठी माणसाच्या समस्यांवर उपाय म्हणून स्व. बाळासाहेब ठाकरे यांनी शिवसेनेची स्थापना केली. काही वर्षांनी ठाणे, मुंबई आणि (तत्कालीन) औरंगाबाद मनपात सत्ता मिळाल्यावर, शिवसेना राज्यभर पसरली. कालांतराने बाळासाहेबांनी भारतीय घराणेशाही परंपरेनुसार नेतृत्व मुलाकडे सोपवले. त्यावेळी त्यांचे पुतणे राज ठाकरे हे पक्षात होणाऱ्या घुसमटीमुळे बाहेर पडले. त्यांनी नवा पक्ष काढला.

या घटनांच्या पार्श्वभूमीवर शिवसेनेचा मुख्य आधार असलेल्या मराठी युवकांच्या जीवनात आलेले चढ-उतार, त्यांची झालेली घालमेल याची नोंद करणारा सिनेमा म्हणजे 'झेंडा.' प्रमुख भूमिकेत होते-पुष्कर श्रोत्री, संतोष जुवेकर, सिद्धार्थ चांदेकर, चिन्मय मांडलेकर, नेहा जोशी, तेजश्री प्रधान, राजेश शृंगारपुरे, शुभांगी गोखले. ही शिवसेनेशी निगडित चार मराठी तरुणांची कथा. पक्ष फुटल्यावर हे जवळचे मित्र दोन पक्षांत विभागले जातात. त्यांच्या नात्यात तणाव निर्माण होत जातो.

नेत्यांचे खरे व्यक्तिमत्त्व कसे असते आणि प्रसारमाध्यमांच्या सहाय्याने कशी त्यांची सोज्वळ, लोकहितकारी आणि उजळ अर्थात खोटी प्रतिमा निर्माण केली जाते, ते या तरुणांना उमगत जाते. त्यांच्यातील मैत्री कमी कमी होत जाते. राजकारणी कसे भोळ्या-भाबड्या युवकांना स्वस्त मजूर म्हणून वापरून घेतात आणि पक्षात एखादे पद निर्माण होते, तेव्हा कसे श्रीमंत व्यक्तीला जवळ करतात, ते पाहून हे तरुण गोंधळतात. एकंदरच राजकारणाची गटारगंगा कळाल्याने टोकाचे निराश होतात. आपल्या नेत्याबद्दलच्या ज्या श्रद्धा, भावना, मनात बाळगल्या त्या कोसळताना पाहून वैफल्यग्रस्त होतात. हे सर्व दाखवणारे एक गाणे प्रसिद्ध लेखक आणि गीतकार अरविंद जगताप यांनी लिहिले होते. अवधूत गुप्ते यांनी संगीत दिलेले हे गाणे त्या काळी खूप गाजले.

जगतापांनी त्या वेळच्या युवकांच्या मनातील द्विधा अवस्था, त्यांना हळूहळू झालेले







राजकारणाच्या ओंगळ अंगाचे आकलन, त्यांची मनस्वी निष्ठा, नेमका तिथेच झालेला अपेक्षाभंग हे सगळे एका गाण्यात बसवण्याचे मोठे आव्हान सहज पेलले. ज्ञानेश्वर मेश्रामांच्या आवाजातल्या त्या गाण्याचे शब्द होते-

**"जगण्याच्या वारीत मिळेना वाट,**
**साचले मोहाचे धुके घनदाट,**
**आपली माणसं, आपलीच नाती,**
**तरी कळपाची मेंढरांस भीती,**
**विठ्ठला... कोणता झेंडा घेऊ हाती?"**



नॉस्टॅल्जिया

**श्रीनिवास बेलसरे**

बाळासाहेबांना राज ठाकरेंनी एकदा 'विठ्ठल' म्हटले होते. गीतकाराने तोच धागा पकडून लिहिले, 'सगळे जगणे एखाद्या वारीसारखे झाले आहे. लोक विचार न करता, केवळ भक्तीत एकामागे एक चालले आहेत. पक्षात घुसलेल्या नव्या लोभी, व्यापारी लोकांनी सगळीकडे स्वार्थाच्या, पैशांच्या मोहाचे धुके पसरवून त्यात अनेकांना ओढून नेले आहे. सगळी नातीगोती विसरली जात आहेत. हे सगळे पटत नाही म्हणून बाहेर पडावे, तर त्या एकट्या मेंढराला इतर मेंढरांची भीती वाटू लागली आहे. (हा संदर्भ कदाचित सेनेचे नगरसेवक स्व. श्रीधर खोपकरांच्या हत्येबाबत असावा.)

लाखो सैनिकांचा झालेला मनोभंग सूचक शब्दात अरविंद जगतापांनी मांडला होता. ते म्हणतात, 'आजवर आम्ही ज्यांची पालखी अक्षरशः भक्तिभावाने वाहिली, त्यांचा देव तर भलताच होता! जसजसे यश मिळत गेले, तसतसे त्यांना भक्तांशी देणेघेणेच राहिले नाही. ज्यांना आम्ही देव समजत होतो, तो तर दगड निघाला. आम्ही दगडी मूर्तीपुढे दिव्यासारखे जळत राहिलो; पण सगळे व्यर्थ गेले. आपलेच शत्रू झाले. कुणीकडे जावे, कुणामागे जावे, आमच्याच पक्षाचे दोन झेंडे झालेत, आता कोणता झेंडा हाती घ्यावा, ते कळतच नाही!

**"आजवर ज्यांची वाहिली पालखी,**
**भलताच त्यांचा देव होता,**
**पुरे झाली आता, उगा माथेफोडी,**
**दगडात माझा जीव होता,**
**उजळावा दिवा म्हणुनिया किती,**
**मुक्या बिचाऱ्या जळती वाती,**
**वैरी कोण आहे, इथे कोण साथी,**
**विठ्ठला, कोणता झेंडा घेऊ हाती.."**

जुनी शिवसेना ही ॲम्ब्युलन्स चालवणारी, भ्रष्ट रेशन दुकानदारांची दुकाने फोडून, तो माल योग्य किमतीत गरजूंना विकून ते पैसे प्रामाणिकपणे त्याच दुकानदाराला नेऊन देणारी होती! चाळीतल्या कुणा मुलीला एखाद्या मवाल्याने छेडले तर त्याला चोप देणारी, बेकारांना नोकऱ्या मिळवून देणारी समाजसेवी संघटना होती. अन्यायाविरुद्ध लढणारी ती जनसेनाच होती. तिचे रूपांतर एका वेगळ्याच, राजकीय महत्त्वाकांक्षेने सैरभैर झालेल्या, पैशामागे धावणाऱ्या संघटनेत झालेले पाहून मराठी समाजच अस्वस्थ होता. अनेक पिढ्यांनी जोपासलेली स्व. बाळासाहेबांबद्दलची श्रद्धा, गणेशोत्सवात एक-दोन महिने निर्माण होणारे मुंबईतले भक्तिमय प्रसन्न वातावरण, कोकणातल्या भाविक माणसाला भावलेले मुंबईतले मोठमोठे गणपती हे सगळे आता व्यर्थ ठरू लागले. इतकेच काय आपले अस्तित्वच एखाद्या बुजगावण्यासारखे झाले आहे, असे त्याला वाटू लागले. सर्व वैध-अवैध आदेश पाळून, स्वतःमागे कोर्ट-कचेऱ्या लावून घेऊन सामान्य शिवसैनिकांच्या पदरी काहीच पडले नाही. ज्या मुंबईला आई मानले, मातृभूमी मानले, तिची काही लोकांनी पैसे कमवायची शेती करून टाकली, वर कुंपणातील शेत खाऊ लागले. हे सगळे असह्य झाल्यावर जगतापांचा युवक जणू स्व. बाळासाहेबांना विचारत होता की, "साहेब, आता मी कोणता झेंडा हाती घेऊ, दोन्ही लेकरे तर तुमचीच ना!"

**"बुजगावण्यागत व्यर्थ हे जगणं,**
**उभ्याउभ्या संपुन जाई,**
**खळं रितं रितं माझं, बघुनी उमगलं,**
**कुंपण हितं शेत खाई,**
**भक्ताच्या कपाळी सारखीच माती,**
**तरी झेंडे येगळे, येगळ्या जाती,**
**सत्तेचीच भक्ती, सत्तेचीच प्रीती,**
**विठ्ठला, कोणता झेंडा घेऊ हाती..."**

आज तर सेनेचे पुन्हा दोन तुकडे झालेत. राष्ट्रवादी काँग्रेस दुभंगली आहे.

# लोक माझ्याशी असे का वागतात...?

लहानपणी वाचलेली ही बोधकथा...

एकदा एक व्यापारी आपला माल बैलगाडीत लादून, एका गावातून दुसऱ्या गावाकडे चालला होता. वाटेत गावाच्या सीमेवर एक जुने मंदिर दिसले. विश्रांतीसाठी काही काळ तो तिथे थांबला. मंदिरात एक साधू बसला होता. त्या साधूने व्यापाऱ्याला पाणी दिले, काही फळे दिली आणि बोलता बोलता कोण, कुठला, कसला व्यापार वगैरे विचारपूस केली. व्यापारी सुखावला. त्याने साधूला आपण कुठून आलो आणि आता कोणत्या गावाला चाललोय वगैरे सांगितले आणि विचारले ''पण काय हो महाराज, त्या पुढच्या गावातली माणसे कशी काय आहेत?''

''कशी म्हणजे?''

''कशी म्हणजे स्वभावाने कशी आहेत? व्यवहाराला कशी आहेत?''

''सांगतो न् पण तुम्ही आधी मला सांगा की, ज्या गावातून तुम्ही आलात, त्या गावातली माणसं तुम्हाला कशी काय वाटली?'' साधूने व्यापाऱ्याला विचारले.

''काही विचारू नका महाराज...'' व्यापाऱ्याने बोलता बोलता खिन्नपणे उसासा सोडला.

''का काय झालं?''

''काय झालं?" अहो काय नाही झालं म्हणून विचारा. अहो मी माझा माल खपवायला गेलो, तर गावातले निम्मे लोक अडाणी त्यांना माझ्या मालाची काहीच माहिती नाही. त्यांना चांगला दर्जेदार माल कसा असतो, हेच मुळात ठाऊक नाही म्हणून माझा माल खपेना. निम्मे लोक अडाणी आणि निम्मे बदमाश. ज्यांनी माझा माल उधारीवर घेतला त्यांपैकी कुणी पैसे द्यायचे नावच काढेना. आणि गावातल्या बायका तर अशा काही चवचाल की विचारू नका...'

''आणि लहान मुलं?'' साधूने मध्येच अडवून विचारले.

''ती तर महा-बदमाश. अहो एवढ्या खोड्या काढायची की माझ्या नाकी नऊ आले.'' बोलता बोलता व्यापाऱ्याचा स्वर कडवट झाला होता, ''पण मला सांगा महाराज, पुढच्या गावातली माणसे कशी आहेत?'' व्यापाऱ्याने उत्सुकतेने विचारले. ''खरं सांगू? फारसा काही फरक नाही. या मागच्या गावातली माणसे आणि पुढच्या गावातली माणसे दोन्ही जवळ जवळ सारखीच...'' ''अरे देवा...!'' असे म्हणून व्यापाऱ्याने आपल्या नशिबाला दोष देत, आणखी तिसऱ्या गावाकडे प्रयाण केले.

दोन दिवसांनंतर आणखी एक व्यापारी त्याच देवळात विश्रांतीसाठी उतरला. त्याने देखील निघताना साधूला तोच प्रश्न विचारला, ''काय हो महाराज, त्या पुढच्या गावातली माणसे कशी आहेत?''

साधूने त्याला विचारलं, ''मागच्या गावातला तुमचा अनुभव काय?''

''उत्तम... काही विचारू नका. अहो, त्या गावातले लोक एवढे अगत्यशील आहेत की, निघताना माझा पाय उचलत नव्हता. गावातली माणसे फारशी शिकलेली नाहीत, पण सुजाण आहेत. व्यवहाराला चोख आहेत. स्त्रिया तर एवढ्या प्रेमळ की, मला माझ्या आईची उणीव भासली नाही, मुले व्रात्य आहेत; पण हुशार आहेत. खूप गमती-जमती करतात...'' व्यापारी मोठ्या उत्साहाने सांगत होता.

साधू हसून म्हणाला की, ''पुढच्या गावातली माणसेदेखील तशीच आहेत. फारसा फरक नाही. तिथेही तुम्हाला चांगलेच अनुभव येतील...'' खूश होऊन व्यापाऱ्याने मोठ्या उत्साहाने नवीन गावाच्या दिशेने प्रयाण केले. कुठल्या तरी मासिकात वाचलेली ही बोधकथा मला खूपच भावली.

साधूने दोन्ही व्यापाऱ्यांना पुढच्या गावातील माणसे कशी आहेत, ते सांगण्यापूर्वी मागच्या गावातील माणसे कशी वाटली, ते विचारले होते आणि दोन्ही व्यापाऱ्यांना पुढच्या गावातली माणसंही साधारण तशीच असतील, असे सांगितले.



संवाद

**गुरुनाथ तेंडुलकर**

दैनंदिन जीवनात वावरताना लोक आपल्याशी कसे वागतात, हे बहुतांशी आपण स्वतः इतरांशी कसे वागतो, यावरच अवलंबून असते. मी मुद्दाम बहुतांशी हा शब्द वापरतोय; कारण एखाद-दुसरा अपवाद हा सापडायचाच.

पान खाऊन थुंकणाऱ्या यवनाला क्षमा करणारा आणि पुनःपुन्हा नदीवर जाऊन आंघोळ करणाऱ्या संयमी संत एकनाथांचे उदाहरण विरळंच. आपण जर दुसऱ्याच्या अंगावर पान खाऊन थुंकलो तर...? तर लोक आपले थोबाड फोडतील अन् लोकांचेच कशाला, आपण स्वतः काय करू? जर कुणी मुद्दाम आपल्या अंगावर थुंकला, तर आपण शांतपणे जाऊन अंघोळ करून येण्याचा संयम दाखवू शकतो का?

एकनाथांसारखा संयमी संत विरळच आणि म्हणूनच मी 'बहुतांशी' असा शब्द वापरला. इतर लोक आपल्याशी वागताना कसे वागतात, हे आपण स्वतः इतरांशी वागण्यावरून ठरवत असतो... तुम्ही एखाद्या भाजीवालीला 'काय गं ताई...' असे बोललात, तर तीदेखील 'काय हो दादा...' असेच उत्तर देईल. कुणाशीही वागताना आपण अदबीने नम्रपणे वागलो की, जगदेखील आपल्याशी तेवढ्याच अदबीने आणि नम्रपणे व्यवहार करते.

पण आपण स्वतः मात्र वागताना बऱ्याचदा चुकतो. समोरच्याशी उर्मटपणे वागतो; पण त्याचबरोबर समोरच्याने मात्र उर्मटपणा केलेला खपवून घेत नाही. लोकांनी माझ्याशी चांगुलपणाने वागायला हवे, अशी अपेक्षा ठेवणारा मी स्वतः मात्र लोकांशी वागताना मला हवं तसं मनमानीपणे वागण्याचे स्वातंत्र्य घेतो. घरीदारी, शेजारी, ऑफिसात, बाजारात कुठेही असेच अनुभव येतात.

एखादी सासू 'सून घरात नीट वागत नाही...!' अशी तक्रार करते, त्यावेळी त्या सासूला विचारावेसे वाटते की, 'बाई गं, तू तुझ्या सुनेबद्दल तक्रारी करतेस, ती नीट वागत नाही, असे म्हणतेस पण तू तरी तिच्याशी नीट वागतेस का?' सूनेने सूनेसारखं न वागवता, मुलीप्रमाणे वागावे अशी अपेक्षा करणाऱ्या सासूचे स्वतःचे वर्तन आईसारखे असते का? याचा विचार करणेही तितकेच गरजेचे नाही का?

जी गोष्ट सासूच्या बाबतीत तीच गोष्ट नवऱ्याच्याही बाबतीत. बायकोच्या कष्टांबद्दल, तिच्या श्रमाबद्दल आपण कौतुकाने बोलतो का? तिने घरासाठी केलेल्या त्यागाची आपल्याला योग्य जाणीव असते का? तिने केलेल्या रुचकर स्वयंपाकाचे आपण मनापासून कौतुक करतो का? कौतुक सोडा... साधी दखल तरी घेतो का? याचाही तमाम नवरे मंडळींनी विचार करायला हवा.

मुलांच्या बाबतीतही हेच घडतं. आपण पालक मंडळी मुलांसमोर वागताना संयम सोडून तसे वागतो. त्यांच्यासमोर खाऊ नये ते खातो, पिऊ नये ते पितो...! टी.व्ही वर बघू नये ते बघतो...! चारचौघांत बोलू नये ते बोलतो...! आणि परिणाम...

तो परिणाम मात्र आपल्याला नको असतो; पण ते परिणाम टाळण्यासाठी आपण पालकांनी ज्या संयमाने वागायला हवे, तसे आपण वागतो का? आपण पालकांनी 'तामसी' वागायचे आणि मुले मात्र 'सात्त्विक' हवीत अशी अपेक्षा करायची हा दुटप्पीपणा नाही का?

घरी-दारी, बाजारी-शेजारी माणसे आपल्यासारखीच सर्वसामान्य माणसे असतात. अनेकदा ती आपल्याशी ज्या पद्धतीने वागतात, त्याचा आपल्याला त्रास होतो, मनस्ताप होतो. हा त्रास आणि ताप टाळण्याचा एकमेव उपाय म्हणजे आपण स्वतः दुसऱ्याशी वागताना आपल्या वागण्याचा दुसऱ्यांना काही त्रास होईल का, याचा विचार करून नंतरच कृती करावी.

समर्थ रामदासस्वामी एका ओवीत म्हणतात...

**आपणासी चिमोटा घेतला ।**
**तेणे जीव कासावीस जाहला ।।**
**आपणावरून दुसऱ्याला ।**
**वोळखीत जावे ।।**

समर्थांनी सांगितलेल्या विचार आपण आचरणात आणला, तर जग एक सुंदर नंदनवनच बनेल.

पण त्यासाठी सर्वप्रथम आपण आपला स्वतःमध्ये थोडा बदल करायला हवा. आपण जगाला बदलायला जातो; पण स्वतःमध्ये बदल करायला मात्र आपली तयारी नसते. किंबहुना 'आपल्यात काही बदल करण्याची गरज आहे.' हेच मुळी अनेकांना मान्य होत नाही. गोष्टीतले दोन्ही व्यापारी एकाच गावातून आले होते; पण त्यांना आलेले अनुभव मात्र भिन्न होते.

'आपल्याशी लोक 'असेच' कां वागतात?' या प्रश्नाच उत्तर...आपणही लोकांशी 'तसेच' वागतो म्हणून...!

# वृंदेचा विष्णूला शाप



विशेष

**भालचंद्र ठोंबरे**

ब्रह्मा, विष्णू, महेश हे त्रिदेव सृष्टीचे रक्षण कर्ता, पालन कर्ता आहेत. ब्रह्मदेव निर्माता, श्रीविष्णू पालन कर्ता, तर महेश म्हणजे महादेव हे दुष्टांचा नाश करण्याकरिता आहेत. सृष्टीचे पालनकर्ता असतानाही श्री विष्णूंना वृंदा नावाच्या एका साध्वीच्या शापाला सामोरे जावे लागले. त्या संदर्भातली ही कथा आहे.

श्रीमददेवी भागवत पुराणानुसार, तसेच शिवपुराणाच्या रुद्रसंहितेतील पाचव्या खंडानुसार एकदा इंद्र व ब्रह्मदेव कैलास पर्वतावर महादेवांच्या भेटीला गेले असता, तेथे इंद्राला मनाजोगता मान न मिळाल्याने, इंद्राने महादेवाचा अपमान केला. त्यामुळे चिडून शंकराने आपला तिसरा डोळा उघडून तांडव सुरू केला. मात्र ब्रह्मदेवाने शिवाची समजूत घालून, आपला क्रोध समुद्रात टाकण्यास सांगितले. त्याप्रमाणे शिवाने तो क्रोध सागरात टाकला. तो क्रोध गंगा व सागर यांच्या संगमावर पडला व त्यातून एक बालक जन्माला आले. त्या बालकाला सिंधू पुत्र व शिवपुत्र असेही म्हटले जाते. तो जलात उत्पन्न झाल्याने, ब्रह्मदेवानी त्याचे नाव जालंधर असे ठेवले. हा शिवाचा मुलगा असला, तरी तो शिवाचा शत्रू होता.

ब्रह्मदेवाने या बालकाला शुक्राचार्यांकडे सोपविले. शुक्राचार्यांनी त्याला मार्गदर्शन केले. तो महाबलाढ्य असूर राजा झाला. जालंधराचा विवाह कालनेमी राक्षसाच्या वृंदा नावाच्या कन्येशी झाला. वृंदा ही विष्णूंची परम भक्त असून, अत्यंत प्रतिव्रता होती. तिच्या पतीव्रतेच्या बलामुळे असुर जालंधर अधिक शक्तिशाली बनला होता. त्याने इंद्र लोकांवर स्वारी करून स्वर्गलोकही जिंकला. आपल्या अतुल शक्तीच्या बळावर तो देवी-देवतांनाही त्रास देऊ लागला. विष्णू लोकावर स्वारी करून, तो लोक जिंकून विष्णू पत्नी लक्ष्मीशी विवाह करण्याची इच्छा त्याच्या मनात उत्पन्न झाली व त्याने विष्णू लोकावर स्वारी केली. मात्र लक्ष्मीने त्याला मीही समुद्रातूनच उत्पन्न झाल्यामुळे, आपण भाऊ-बहीण असल्याचे लक्षात आणून दिले. त्यामुळे त्याने हा नाद सोडला व परत फिरला. त्यानंतर तो कैलासावर स्वारी करून, सतीशी ही विवाह करण्याची इच्छा व्यक्त केली. त्यामुळे सतीला राग आला. तेव्हा महादेव व जालधंरामध्ये युद्ध झाले. मात्र पत्नी वृंदाच्या सतीत्वाच्या बळामुळे महादेव त्याला पराजित करू शकले नाहीत. तेव्हा सर्व देवांनी विष्णूकडे जाऊन, त्यांची आराधना केली व जालंधराचे पारिपत्य करण्याची विनंती केली. परंतु वृंदा ही विष्णूंची परमभक्त असल्यामुळे विष्णूने यात मदत करण्याचे नाकारले. परंतु देवांनी त्यावर दुसरा उपाय असेल, तर सांगा असे म्हटले; परंतु दुसरा कोणताही उपाय नसल्याने विष्णूने अखेर देवांचे म्हणणे मान्य केले. ते जालंदराच्या रूपात वृंदाच्या महालात गेले.

जालंधर युद्धावर असताना, वृंदा त्याच्या यशासाठी पूजेद्वारे साधना करीत असे. आपला पती आल्याचे समजून वृंदेने जालंधर रूपात असलेल्या विष्णूंचे चरणस्पर्श केले व त्याला आलिंगन दिले; परंतु त्या मीलनात पतीप्रेमाची ओढ नसल्याचे तिला जाणवले. मात्र या कृतीमुळे तिचे पावित्र्य भंग झाले. त्यामुळे तिकडे महादेव व जालंधराच्या चालू असलेल्या युद्धामध्ये जालंधराचा वध झाला. मीलनात पती प्रेमाची ओढ न भासल्याने, वृंदेने आपल्या सात्विक तपोबलाने समोर दिसणारे जालंधराचे रूप मायावी असल्याचे जाणून साशंकतेने पाहताच विष्णू आपल्या मूळ रूपात प्रकट झाले. (काही ठिकाणी जालंधराचे शिर वृंदाच्या महालात येऊन पडले ते पाहून समोर दिसणाऱ्या जालंधराकडे विस्मयचकीत होऊन पाहताच, विष्णू आपल्या मूळ रूपात प्रकट झाले असाही उल्लेख आहे.)

श्रीविष्णूंकडून आपली फसवणूक होऊन विश्वासघात झाल्याचे लक्षात येताच, वृंदेने विष्णूला तू काळा दगड होऊन पृथ्वीवर पडशील व तुला आपल्या पत्नीचा विरह करावा लागेल. तसेच तुझ्या पत्नीलाही सतीत्वावरून आरोपाचा सामना करावा लागेल, असा शाप दिला. भगवान विष्णू ताबडतोब शिळा झाले. मात्र लक्ष्मी व सर्व देवतांच्या विनवणीवरून वृंदाने तो शाप मागे घेतला. मात्र विष्णूंनी वृंदेला तू तुळस रूपात सदैव माझ्या शाळीग्राम रूपाच्या सान्निध्यात राहशील, असा आशीर्वाद दिला. पतीच्या विरहात वृंदेने स्वतःला अग्नीच्या हवाली केले. तिच्या राखेतून त्या ठिकाणी एक रोपटे निर्माण झाले. विष्णूने त्याला तुळस असे नाव दिले. याच तुळरूपी वृंदाचा व शाळीग्राम रूपातील विष्णूचा दरवर्षी विवाह लावण्यात येतो. यालाच तुलसी विवाह म्हणतात. वृंदाने दिलेल्या शापामुळे श्री विष्णूंना राम अवतारात पत्नी सीतेचा विरह सहन करावा लागला व सीतेलाही सतीत्वाच्या आरोपाला सामोरे जावे लागले.

**तात्पर्य :** जग कल्याणासाठीही जरी भगवंताने चुकीचे कर्म केले असेल, तर त्यांनाही या चुकीच्या कर्माचे फळ भोगावे लागते.





# कोचिंग सेंटर्सचा बाजार

एकीकडे पूजा खेडकरसारखे नतद्रष्ट यूपीएससीची फसवणूक करून व अनेक नियम-निकष धाब्यावर बसवून, आयएएसच्या शिडीवर चढून दादागिरी करतात. दुसरीकडे खूप अभ्यास करून कोचिंग सेंटर्सच्या वर्गात व लायब्ररीत रात्री उशिरापर्यंत बसून यूपीएससी परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांची स्वप्ने कोचिंग सेंटर्सच्या कारभाराने ध्वस्त होतात. राज्यातील किंवा केंद्रातील राज्यकर्ते बदलत राहतील; पण प्रशासन चालवणारे नोकरशहा तेच असतात. सरकार कोणाचेही आले, तरी त्यांना फरक पडत नाही. सेवाभावी मनोवृत्तीतून सर्वसामान्य जनतेसाठी काम करणारे अधिकारी शोधावे लागतात, अशी आज परिस्थिती आहे. मग चांगले आयएसएस अधिकारी निर्माण करायचे असतील, तर त्यांना सेवाभावी वृत्तीतून शिक्षण, प्रशिक्षण आणि मार्गदर्शन मिळाले पाहिजे; पण देशातील मोठ्या शहरांतून आणि महानगरांतून कोचिंग क्लासेस व कोचिंग सेंटर्सचा सुळसुळाट झाला आहे. कोचिंग सेंटर्स उभारणे व चालवणे हा एक मोठा बिझनेस झाला आहे. लाखो रुपये फी घेऊन आणि यूपीएससी परीक्षेच्या तयारीचे अमिष दाखवून, ही बाजारपेठ चालू आहे. याच बाजारपेठेने राजधानी दिल्लीत तीन विद्यार्थ्यांचे बळी घेतले, तेव्हा कुठे कोचिंग सेंटर्सच्या बेकायदा व बेलगाम कारभाराकडे सरकारचे लक्ष वेधले गेले.

दिल्लीतील या घटनेची चौकशी सीबीआयकडे सोपविण्यात आली आहे; पण कोचिंग सेंटर्सच्या मुजोर चालकांना जबर कशी बसणार, हा लाख मोलाचा प्रश्न आहे. राजधानी दिल्लीत ओल्ड राजेंद्र नगर, नेहरू विहार, गांधी विहार, करोलबाग, पटेल नगर, लक्ष्मी नगर, मुखर्जी नगर येथे यूपीएससीच्या परीक्षांची तयारी करून घेणारी अनेक कोचिंग सेंटर्स आहेत. चार विद्यार्थ्यांचे बळी गेल्यानंतर केंद्र सरकार व दिल्ली सरकार यांनी एकमेकांवर आरोप-प्रत्यारोपाचा खेळ सुरू केला. २७ जुलै २०२४ रोजी सायंकाळी दिल्लीतील ओल्ड राजेंद्र नगरमधील राव आयएएस कोचिंग सेंटरमध्ये तळघरात असलेल्या लायब्ररीत चाळीस विद्यार्थी अभ्यास करीत बसले होते. २० सप्टेंबरला सिव्हिल सर्व्हिसेस मेनची परीक्षा असल्याने, विद्यार्थी दिवस-रात्र अभ्यास करीत आहेत. त्या दिवशी दिल्लीत मुसळधार पाऊस झाला, पावसाचा जोर एवढा वाढला की, राजधानीतील सर्व प्रमुख रस्त्यांवर पाणीच पाणी झाले. दिल्ली हे देशाच्या राजधानीचे शहर असले, तरी ब्रिटिशांच्या काळातील या शहरात ड्रेनेज सिस्टीम जुनी आहे. दिल्लीला सर्वत्र बहुमजली व उत्तुंग इमारतींचा विळखा आहे. त्यामुळे ओल्ड राजेंद्र नगरमध्ये पावसाचे पाणी वेगाने वाहून जाण्याची व्यवस्था नाही, ड्रेनेजची तेवढी क्षमता नाही आणि पाणी निचरा होण्यास जागाच नाही. त्यामुळे रस्त्यांवरून कमरेइतके पाणी वेगाने वाहत असताना, राव कोचिंग सेंटर्सच्या तळघरात वेगाने घुसले. तेथे अभ्यास करीत बसलेल्या मुलांना या पाण्याने वेढले. मुलांनी घाबरून पळ काढायला सुरुवात केली; पण पाण्यात अडकून व गुदमरून शेवटी तिघांचा मृत्यू झाला. श्रेया यादव (वय २५), निविन डाल्विन (२८), तान्या सोनी (वय २५) या विद्यार्थ्यांचा पाण्यात अडकून, बुडून, घुसमटून मृत्यू झाला. या घटनेपूर्वी राजेंद्र नगरला लागून असलेल्या पटेल नगरमध्ये २६ वर्षांच्या विद्यार्थ्याचा विजेचा शॉक बसून मृत्यू झाला होता. तिथे अभ्यास करून, तो पेईंग गेस्ट म्हणून जिथे राहत होता, तिथे निघाला, पण वाटेत रस्त्यावर पाणी होते म्हणून चालताना एका लोखंडी दरवाजाला पकडून तो पुढे निघाला, तोच विजेचा प्रवाह त्यांच्या शरीरात घुसला व तो मरण पावला.



स्टेटलाइन

डॉ. सुकृत खांडेकर

यूपीएससीच्या परीक्षांची तयारी करणारे विद्यार्थी हे दारूच्या नशेत त्यांच्या वडिलांची आलिशान गाडी चालवताना अपघात होऊन मरण पावले नव्हते. कुठे गुंडगिरी किंवा दहशतवाद करीत नव्हते. कुठे कोणाच्या नावाने झिंदाबाद किंवा मुर्दाबाद अशा घोषणा देत नव्हते. ते अभ्यासात मग्न होते, आपल्याला प्रशासनात मोठे अधिकारी व्हायचे, हे त्यांचे स्वप्न होते. यूपीएससीमध्ये चांगली गुणवत्ता प्राप्त करून यश मिळवायचे, हेच त्यांचे ध्येय होते. पुराच्या पाण्यात बुडून किंवा विजेचा शॉक लागून त्यांचा मृत्यू झाला, याला जबाबदार कोण? हीच मुले शिकण्यासाठी देशातून वेगवेगळ्या भागांतून दिल्लीला आली होती. एका खोलीत अन्य चार जणांबरोबर पेईंग गेस्ट म्हणून राहत होती. पेईंग गेस्ट म्हणून दरमहा दहा ते बारा हजार भाडे मोजत होती. शिवाय कोचिंग सेंटरची फी वेगळीच! दिल्लीमध्ये आप सरकारने २०० युनिट वीज मोफत दिली आहे; पण मोफत मिळणारी वीज पेईंग गेस्ट राहणाऱ्या विद्यार्थ्यांना १२ ते १५ रुपये युनिट विकली जाते. एवढेच नव्हे तर वापरायचे पाणीही कित्येक ठिकाणी विकत घ्यावे लागते. हे सर्व निमूटपणे सहन करून, ही मुले कोचिंग सेंटर व लायब्ररीत सारा वेळ अभ्यासात व्यग्र असतात. आयएएस हेच स्वप्न घेऊन ही तरूण मुले आपले घरदार, गाव सोडून दिल्ली, कोटा, अहमदाबाद, हैदराबाद अशा ठिकाणी अभ्यासासाठी येतात व भरमसाट फी देऊन कोचिंग सेंटरला नाव नोंदवतात.

काही कोचिंग सेंटर्सची फी अडीच लाख रुपये आहे. एवढी रग्गड रक्कम मोजल्यावरही एका मोठ्या हॉलमध्ये ४०० ते ५०० मुले लेक्चरसाठी एकत्र बसवली जातात. अभ्यासासाठी व नोट्स काढण्यासाठी याच मुलांना कोचिंग सेंटरच्या इमारतीच्या तळघरात पाठवले जाते. दिल्ली महापालिकेच्या महापौर शैली ओबराय यांनी स्पष्ट म्हटले आहे की, "तळघरात केवळ पार्किंग व स्टोअरेजसाठी परवानगी आहे, तेथे कोचिंग क्लासेस, स्टडी रूम वा लायब्ररीसाठी परवानगी दिलेली नाही... तळघरात कोणाला राहण्यासाठी किंवा बसण्यासाठी अनुमती दिलेली नाही; पण कोचिंग सेंटर्सचा बाजार भरवणारे त्यांचे चालक हे बेलगाम वागत असतात. आपल्याला कोणी विचारणारे नाही, अशी त्यांची भावना असते; पण ओल्ड राजेंद्र नगरमधील कोचिंग सेंटरमधील तळघरात पाणी घुसल्याने व त्यात विद्यार्थ्यांचा बुडून मृत्यू झाल्याने कोचिंगवाल्या माफियांची पोलखोल झाली आहे. या तळघरात आतमध्ये येण्याचा व बाहेर जाण्याचा रस्ता एकच होता. जर पुराच्या पाण्याने व पाण्याच्या वेगाने दरवाजे बंद झाले असते, तर फार मोठी जीवितहानी झाली असती.

ओल्ड राजेंद्र नगरमध्ये सर्वच इमारतींच्या भोवती विजेच्या तारा लोंबकळत आहेत, त्या एकत्र बांधण्याचेही कोणी कष्ट घेत नाही. यूपीएससीचे विद्यार्थी बळी पडले, याला जबाबदार कोण, हे आठ दिवसांनंतरही राज्य किंवा केंद्र सरकार सांगू शकलेले नाही. राज्य सरकार आम आदमी पक्षाचे म्हणून त्याला दोष दिला जातोय. दिल्ली महापालिका स्थानिक समस्यांना जबाबदार म्हणून महापालिकेकडे बोट दाखवल जाते. उपराज्यपाल कुठे आहेत, असाही प्रश्न विचारला गेला. केंद्र सरकारची काहीच जबाबदारी नाही का?" दिल्लीचे उपराज्यपाल व्ही. के. सक्सेना यांनी म्हटले आहे की, "जे घडले ते अक्षम्य आहे. या घटनेकडे दुर्लक्ष करता येणार नाही."

दिल्लीत सन २०१५ मध्ये आपची सत्ता आली; पण केंद्र सरकारने दिल्लीच्या प्रशासनावर व अधिकाऱ्यांवर नियंत्रण ठेवणारे सर्व अधिकार उपराज्यपालांना दिले. दिल्ली सरकारने त्या विरोधात सर्वोच्च न्यायालयात दाद मागितली. सन २०२३ मध्ये, सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निकालात शासकीय अधिकाऱ्यांनी लोकांनी निवडून दिलेल्या राज्य सरकारच्या अखत्यारीत काम करावे असे म्हटले; पण केंद्रातील भाजपा सरकारने पुन्हा एक कायदा बनवून, अधिकाऱ्यांवरील नियंत्रण उपराज्यपालांकडे सोपवले.

दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल जेलमध्ये आहेत. दिल्लीचे दोन नंबरचे ताकदवान मंत्री मनीष सिसोदिया हेसुद्धा जेलमध्ये आहेत. दिल्लीतील नोकरशहांना केवळ केंद्र सरकार आदेश देऊ शकते. केंद्रीय गृहमंत्रालयाचीच राजधानी दिल्लीवर हुकूमत चालते. रस्त्यावर आलेल्या पुराच्या पाण्यात ज्याने मोटार घुसवली, त्या चालकावर पोलिसांनी कारवाई केली; पण आजतागायत दिल्ली महापालिकेच्या एका अधिकाऱ्यावर गुन्हा नोंदवला गेलेला नाही. दि. २७ जुलै रोजी ओल्ड राजेंद्र नगरमधील घटनेवर राज्यसभेत चर्चा झाली. तेव्हा भाजपाच्या खासदारांनी आपची सत्ता असलेल्या दिल्ली सरकारलाच दोष दिला. शिक्षण हा विषय राज्याच्या अखत्यारीत येतो. मग बेकायदा कोचिंग सेंटर्सवर दिल्ली सरकारने कारवाई का केली नाही, असा प्रश्न भाजपाने विचारला. कोचिंग सेंटर्सचे नियमन करण्यासाठी, केंद्र सरकारने सर्व राज्यांना २०१९, २०२० व २०२४ मध्ये निर्देश पाठवले होते. कोचिंग संस्थांची नोंदणी व किमान दर्जा याचे पालन झाले पाहिजे, असे त्यात म्हटले होते. त्यामुळे बेकायदा कोचिंग सेंटर्सचा बाजार झाला असेल, तर राज्यांना आपली जबाबदारी झटकता येणार नाही. जरी चौकशी झाली, तरी कोचिंग सेंटर्सना राजकीय आशीर्वाद आणि प्रशासकीय बाबूंचे पाठबळ कोणाचे आहे, हे कधीच बाहेर येणार नाही.


sukritforyou@gmail.com
sukrit@prahaar.co.in


# जनसामान्यांची मराठी

प्रवासातला एक छोटासा प्रसंग; पण तो इतका प्रभावी की, आज त्यावरच बोलावेसे वाटते. मैत्रिणीच्या घरातून बाहेर पडले नि रिक्षा थांबवली. रिक्षामध्ये बसले नि रिक्षावाल्या दादांना विचारलं, ''मराठी समजतं तुम्हाला? म्हणजे पत्ता सांगते नीट .''

रिक्षावाला दादा लगेच म्हणाला. "जो महाराष्ट्रात राहतो, त्याची भाषा मराठीच. मग तो कुठल्याही जाती-धर्माचा असो, त्याला संवादापुरती मराठी यायलाच हवी."

रिक्षावाला अस्सल मराठमोळा होता नि मराठीचा अभिमानी होता. आम्हा दोघांना जोडणारा धागा आपल्या भाषेचा होता म्हणून सहज गप्पा सुरू झाल्या.

तो म्हणत होता, "मी माझ्या रिक्षामध्ये बसणाऱ्या प्रत्येक माणसाशी मराठीतच बोलतो. त्या दिवशी एक तरुण मुलगा रिक्षामध्ये बसला. फोनवर कुणाशी तरी अखंड हिंदीत बोलत होता. नंतर फोन थांबला मग माझ्याशी जिथे जायचेय, त्या ठिकाणाचे, रस्त्याचे काही तरी बोलू लागला. तो हिंदीतच विचारत होता नि मी मराठीत उत्तरे देत होतो. इतक्यात त्याला त्याच्या आईचा फोन आला. त्याच्या बोलण्यावरून समजले. तो तिच्याशी मात्र मराठीत बोलत होता. त्याला जिथे जायचे होते, ते ठिकाण आले. तो खाली उतरताना मी त्याला म्हणालो, ''मराठीही आपली आईच आहे.''



मायभाषा

डॉ. वीणा सानेकर

त्याने पैसे दिले नि तो निघून गेला. मला जे म्हणायचे, ते मी पोहोचवले होते. किती सहज त्या रिक्षावाल्याने सांगितले होते की, आपली भाषा टिकवणे आपल्या हाती आहे. त्याकरिता ती आपल्या दैनंदिन जीवनाचा भाग झाली पाहिजे.

रिक्षावाल्याला मराठीविषयी प्रेम होते. हे तर खरेच, पण मराठीबाबत त्याचा काही एक स्पष्ट विचारही होता. तो पुढे म्हणाला, ''शिवाजी महाराजांनी जे जे स्वराज्याकरिता केले, तेही आम्ही विसरलो आहोत. राज्य आपल्या भाषेतून चालावे, असे त्यांना वाटत होते. आज आपण आपल्या भाषेलाच विसरत चाललो आहोत."

तो तिथेच थांबला नाही. पुढे कौटुंबिक माहिती सांगू लागला. त्याने त्याच्या दोन्ही मुलांना मराठी माध्यमातून शिकवले. दोघांनी खूप चांगले शिक्षण घेतले होते. मुलीचे लग्न मोठ्या कुटुंबात झाले. मराठी माध्यमातून शिकलेली सून मिळाल्याने सासरचे खूप खूश आहेत, कारण त्यांच्या घरात मुलांचे शिक्षण इंग्रजीत झाले आहे.

रिक्षावाल्या दादांची मुले कधी- कधी विचारतात की, तुम्ही आम्हाला मराठी माध्यम शाळेत का घातले? तेव्हा दादा उत्तर देतात, ''त्यामुळे तुमचे काही नुकसान झाले आहे काय?"

त्या दिवशी भेटलेल्या रिक्षावाल्या दादांनी हे मनावर ठसवले की, त्यांच्यासारखी साधी-सामान्य माणसेच मराठी जगवतील, यात शंका नाही.




# हवाई सुंदरी बनली उद्योजिका

उत्तर प्रदेशातील बरेली या छोट्याशा शहरात लहानाची मोठी झालेली ती मुलगी आकाशातील विमान पाहून, इतर मुलांसारखी आनंदाने टाळ्या वाजवायची. पुढे तीच मुलगी विमानातील हवाई सुंदरी बनते. दुर्दैवाने कोरोना काळात तिची नोकरी जाते. निराश झालेल्या याचिकाला आईची जुनी डायरी मिळते. त्या डायरीने तिच्या आयुष्याचा उद्योजिका म्हणून अध्याय लिहिला जातो. हा उद्योग अध्याय आहे-याचिका चोप्रा यांचा.

याचिका मध्यमवर्गीय कुटुंबात वाढली. तिने बरेली येथील बिशप कॉनरॅड सीनियर सेकेंडरी स्कूलमध्ये १० वी पर्यंत शिक्षण घेतले. तिचे कुटुंब १९९९ मध्ये पुण्यात आले. तिने हचिंग्ज हायस्कूलमध्ये प्रवेश घेतला, जिथे तिने २००१ मध्ये १२ वी पूर्ण केली. त्यानंतर तिने वाडिया कॉलेजमधून बी कॉम केले. त्यानंतर एका नावाजलेल्या शैक्षणिक संस्थेतून तिने मानव संसाधन (एचआर) विषयात एमबीए केले. पुढे तिने पुण्यातील एका वित्तीय कंपनीच्या एचआर विभागात सुमारे एक वर्ष काम केले.

काही काळानंतर याचिकाला तिची नोकरी नापसंत वाटू लागली. सदर नोकरी कर्मचाऱ्यांच्या नियुक्तीशी संबंधित होती. मात्र याचिकाला संप्रेषण आणि प्रशिक्षणाशी संबंधित काही तरी करण्यात स्वारस्य होते, जे एचआरमध्ये समाविष्ट होते; पण त्या तत्कालीन कंपनीमध्ये तिला करता येत नव्हते.

एके दिवशी २०११ मध्ये, भारतीय वाहतूक कंपनीमध्ये काम करणाऱ्या तिच्या मावशीने तिला एअर इंडियामध्ये हवाई सुंदरीच्या नोकरीसाठी मुलाखत देण्यास सांगितले. ती नोकरीसाठी एवढी काही उत्सुक नव्हती; पण एचआर नोकरीवर ती खूश नसल्यामुळे, तिच्या कुटुंबीयांनी तिला मुलाखतीस जायला सांगितले. दुर्दैवाने तिला एअर इंडियामध्ये नोकरी मिळाली नाही; परंतु तिला जेट एअरवेजमध्ये हवाई सुंदरी म्हणून नियुक्त करण्यात आले. तिथे तिने मुंबईत सुमारे एक वर्ष काम केले. २०११ मध्ये, ती दुबईमध्ये एमिरेट्समध्ये सामील झाली. ही नोकरी तिला खूप आवडली. आलिशान हॉटेल्समध्ये राहणे, लॉस एंजेलीस आणि दुबईदरम्यान फ्लाइटमध्ये प्रवास करणे ही तिची दैनंदिनी होती. अनेक सेलिब्रिटी आणि उद्योजकांना भेटणे सहज शक्य असायचे. हे आपल्या आयुष्यातील सर्वोत्तम क्षण होते, असे याचिकाला वाटते.




याचिका चोप्रा



दी लेडी बॉस

अर्चना सोंडे

दरम्यान २०१९ मध्ये, तिने गोव्यात टूर आणि ट्रॅव्हल व्यवसाय चालवणाऱ्या रे वाझसोबत लग्न केले. २०१९च्या सरत्या वर्षात कोरोनाने जगभर थैमान घालण्यास सुरुवात केली. अवघ्या जगात लॉकडाऊन झाले. उद्योग डबघाईस आले. कित्येकांच्या नोकऱ्या गेल्या. पहिली कुऱ्हाड हवाई वाहतूक कर्मचाऱ्यांवर पडली. याचिका पण यातून सुटली नाही. ८ जुलै २०२० रोजी या महामारीच्या काळात तिला तिच्या नोकरीवरून काढून टाकण्यात आल्याची माहिती देणारा ई-मेल आला. त्यावेळी याचिका पतीसोबत गोव्यात राहत होती. ई-मेल वाचून तिला धक्काच बसला. आपल्याला नोकरीवरून काढून टाकण्यात आले, हे मान्य करायला तिला दोन-तीन दिवस लागले. या दुःखात अजून एक भर म्हणजे तिची आईसुद्धा निर्वतली. याचिका आतून पुरती तुटली होती. विश्रांती घेण्याची ही एक चांगली संधी आहे. असे सांगत याचिकाच्या पतीने तिला सावरण्याचा प्रयत्न केला. याच सुमारास गोव्यातील बारदेझ येथे घर साफ करत असताना, तिला तिच्या आईची जुनी डायरी सापडली, ज्यामध्ये लोणच्याच्या सर्व पाककृती होत्या. या पाककृतीचा वापर करत, तिने घरगुती लोणचे तयार केले.

तिच्या घरच्यांना लोणचे फार आवडले. आपण लोणच्याचा व्यवसाय सुरू केला तर... तिच्या डोक्यात कल्पना आली. पतीने तिला प्रोत्साहन दिले. एप्रिल २०२१ मध्ये, गोव्यातील पर्वरी येथील तिच्या घरातून २०,००० रु. गुंतवून तिने लोणच्याचा व्यवसाय सुरू केला. तिने लोणच्यासाठी काही भांडी आणि साहित्य खरेदी करण्यासाठी हे पैसे गुंतवले आणि तिचे पहिले उत्पादन बनवले-मिरचीचे लोणचे. आपल्या ब्रँडला 'सीरका' असे नाव दिले. आज ती दर महिन्याला सुमारे १ लाख रुपये कमावते.

याचिका घरूनच काम करते. सुरुवातीला याचिकाने इन्स्टाग्राम पेज सुरू केले आणि कुटुंबातील सदस्य आणि मित्रांना मोफत लोणचे देऊ केले. "मला खात्री होती की, जर लोकांना ते आवडले, तर ते आणखी ऑर्डर करतील. ग्राहकांना आकर्षित करण्याची माझी रणनीती होती आणि ती कामी आली," याचिका सांगते. काही महिन्यांत विक्री हळूहळू वाढत गेली. लोक याचिकाच्या उपक्रमासाठी आणि चवदार लोणच्यासाठी तिचे कौतुक करत होते. शिवाय साहित्य खरेदी करण्यापासून ते बनवण्यापर्यंत आणि ऑर्डर पूर्ण करण्यासाठी ते पॅक करण्यापर्यंतच्या प्रत्येक कामाचा ती आनंद घेत होती. एका ग्राहक प्रदर्शनात तिला काही तासांत ६० जार विकण्यात यश आले, तेव्हा तिला मोठा ब्रेक मिळाला. हा तिच्यासाठी उत्साहवर्धक क्षण होता. त्यामुळे तिने लोणच्याच्या आणखी विविध प्रकारांवर प्रयोग करायला सुरुवात केली. याचिका आता आठ प्रकारचे लोणचे तयार करते. गाजर, मिरची, फ्लॉवर, वांगी, लसूण, आंबा, टोमॅटो आणि लिंबू. ते १०० ग्रॅम (१२५ रुपये किमतीचे) आणि २०० ग्रॅम (२७५ रुपये किमतीच्या) जारमध्ये येतात. ही सारी उत्पादने त्यांच्या वेबसाइटवर तसेच अमेझॉनवर उपलब्ध आहेत. पावसाळ्यात तिला अधिक ऑर्डर मिळतात. तिची उत्पादने सहा महिने ते एक वर्ष टिकू शकतात. सुरुवातीच्या काळात ग्राहक फोन आणि व्हॉट्सॲपद्वारे ऑर्डर देत असत. एक दिवस याचिकाच्या भावाने तिला कॉल केला की, त्याच्या एका सहकाऱ्याने ऑर्डर दिली नाही, कारण त्याला सीरकाची वेबसाइट सापडली नाही. तसेच अमेझॉन आणि फ्लिपकार्टसारख्या ई-कॉमर्स वेबसाइटवर सुद्धा ती उत्पादने सापडली नाहीत. तेव्हा याचिकाला वेबसाइटचे महत्त्व समजले. तिने लगेच एक वेबसाइट सुरू केली. तिचे दोन लहान भाऊ रेस्टॉरंट्स चालवतात आणि याचिकाला व्यवसाय चालवण्यासाठी टिप्स देतात. तिने वेबसाइट लाँच केल्यानंतर विक्री ४५ टक्के वाढली. आता ९० टक्के ऑर्डर तिच्या वेबसाइटवरून येतात आणि उर्वरित अमेझॉन, फोन कॉल्स आणि व्हॉटसॲपवरून येतात.

सप्टेंबर २०२१ मध्ये, तिला अमिरातीकडून नोकरीची ऑफर देणारा फोन आला. याचिका द्विधा मनःस्थितीत होती, कारण ती असा व्यवसाय चालवत होती, जो अब्जावधी डॉलर्सचा व्यवसाय बनू शकतो किंवा एक दिवस बंद होऊ शकतो आणि दुसरीकडे तिच्या आवडीच्या नोकरीची ऑफर होती; पण तिने तिचा व्यवसाय निवडला; कारण व्यवसाय तिच्या आईला श्रद्धांजली आहे. शिवाय याचिकाला आयुष्यात पहिल्यांदाच जाणवले की, ती स्वतः काही करू शकते. तिला स्वतःचा आनंद आणि अभिमान वाटत होता. त्यामुळे तिने एअरलाइनची संधी नाकारली.


याचिका एक मॅन्युफॅक्चरिंग हब बनवण्याची योजना आखत आहे, जिथे ती वंचित समुदायातील महिलांना रोजगार देऊ शकेल आणि मोठ्या स्तरावर व्यवसाय चालवू शकेल.

एक हवाई सुंदरी लोणच्यासारख्या घरगुती व्यवसायात उतरते. महिन्याला लाखांची उलाढाल करते. इतकेच नव्हे तर इतर वंचित महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याचा विचार सुद्धा करते. हे सारं एक सक्षम अशा लेडी बॉसचे लक्षण आहे.


theladybosspower@gmail.com


# आनंदाचं झाड...

मुंबईसारख्या गजबजलेल्या शहरात सुख-दुःखाचे, आनंदाचे, शौर्यातीत पराक्रमाचे लहान-मोठे असे प्रसंग वारंवार घडत असतात. वर्षाचे तीन ऋतू, बारा महिने आणि अधिक मास यामधले जीवनचक्र गतिमान होते, ते जगण्याच्या धावपळीत अन्नधान्य, निवारा शोधण्यासाठी बाहेर पडलेल्या मुंबईकरांमुळे. एक पाय घरात आणि एक पाय बाहेर असलेल्या प्रत्येकावर कसली ना कसली टांगती तलवार असते. संध्याकाळ होईस्तोवर आपला माणूस व्यवस्थित घरी यायला हवा, ही घरच्यांना लागून राहिलेली चिंता माणसाला स्वस्थ बसू देत नाही. सदान्‌कदा प्रश्नांच्या गर्तेत अडकलेल्यांना मानसिक, शारीरिक प्रकारच्या ताणांना सामोर जावे लागते. ताण निर्माण करणाऱ्या बऱ्याचशा गोष्टी आपल्या आसपास घडत असतात. त्यातली पहिली गोष्ट म्हणजे सतत बदलत असलेली आपली जीवनशैली. मानवी जीवन क्षणभंगुर असल्याने, सुखाच्या हव्यासापोटी दैनंदिन जीवनातल्या गरजांसाठी आपण आपला आनंद आणि सुखी जीवन दुःखाच्या अथांग सागरात लोटतो.



मोरपीस

पूजा काळे

मनुष्याच्या जगण्याच्या विविध तऱ्हा असल्याने, त्यानुसार तो त्याच्या पद्धतीने जीवनाचा आनंद घेतो. या आनंदात आहार, विहार, निद्रा यांवर परिणाम होऊन समतोल मात्र बिघडतो. पाऊस, पाणी, प्रदूषण, रोगराई, आजार, कडक उन्हाळा या विषयांवर 'मुंबईचे आरोग्य धोक्यात' या मथळ्याखाली एक बातमी कानावर आली. त्यानिमित्तानेच पार पडलेल्या एका डॉक्टरी सभेच्या आयोजनात मला हजर राहण्याचा योग आला. आनंदीत राहा आणि दीर्घायुषी व्हा या विषयावरील परिसंवादात मनाला आणि एकूणच शरीराला चकटफू आरोग्य मंत्र मिळताच, आनंदाच्या गुरुकिल्लीची गोष्ट आठवत माझे विचारचक्र सुरू झाले.

तसं तर, जगातली निम्म्याहून अधिक माणसे मनावर ओझे घेऊन जगतात. अहो स्मितहास्य तर सोडाचं, पण रस्त्यावर भेटलेल्या ओळखीच्या माणसाची ओळख आठवेपर्यंत आपण ती विसरतो...! हे असं होत बघा...! मंडळी मनुष्य ज्यामुळे जास्त आनंदी होतो, त्यात सुधारणा झाली, तर आनंदी आनंद चोहीकडे पसरेल. या आनंद लहरी तरंगत येतील हवेतून. त्यावेळी ज्यांच्या जाणिवा-जागृती कार्यक्षम असतील, त्यावेळी त्यांना आनंदाची कमतरता भासणार नाही. दुःखाचे डोंगर आडवे आले, तरी हर्षल वायू लहरी वाहतील. आनंदाच्या झऱ्याचा उगम आपल्या अंतःकरणात असतो. तो ज्याला कळतो, त्याच्या आयुष्याचे सोने होते. बाबा आमटे यांच्या आनंदवनाची संकल्पना ही दीनदुबळ्यांच्या सेवेसाठी आनंदाची पायमल्ली ठरलीयं. समाजातले अनेक घटक, सामाजिक संस्था, समाजसेवक आपल्यापरीने आनंदाचे साम्राज्य पसरवण्यासाठी हातात हात घालून




उभे आहेत. त्यांच्या वाट्याला दुःखद प्रसंग आले असतीलच...! त्यातून तावून सुलाखून निघाल्यावरचं त्यांचे कार्य जगासमोर आल असणार. म्हटलं तर सत्यवचन ही आनंदाची खूण आहे. विवेकी धोरणामुळे आनंदाला बळकटी प्राप्त होते. त्यासाठी दिलेला सहयोग चिरकाल आनंद देतो. आपल्याकडे म्हणजे समाजात आनंदाच्या व्याख्या व्यक्तीगणिक बदलतात. कधी कुणाला खाण्यात आनंद मिळतो. कुणाला देण्यात आनंद मिळतो, तर नवीन गोष्टी घेण्यात काही धन्यता मानतात. काही अवलियावीर अनोख्या अशा विक्रमाचे सरदार बनतात. शेजारच्या सुमन काकी पलीकडच्या दादरकर काकूंना बडबडण्यात तोंडसुख घेतात. मित्र रमेश सुरेशच्या चांगल्या गोष्टींना नाव ठेवण्यात वेळ दवडतो. बंड्याकडे सायकल जाऊन स्कूटर आलीयं, हा त्याचा आनंद तर गुर्जर काकांच्या बढतीसह बदलीचे आनंदी वारे वाहत आहेत, हा त्यांचा आनंद. आनंदाला जसे बांधून ठेवता येत नाही, तसेच तो कवेतही घेता येत नाही. क्षणभर आनंदासाठी लोकं आपला पैसा-वेळ खर्च करतात. दोन पैशाचा आणि बिन पैशाचा आनंद हा भाग अजून वेगळा असतो. आपल्या आनंदासाठी प्रयत्न करण्यापेक्षा दुसऱ्याला काय दिले तर सौख्य मिळेल, याचा विचार हवा.

आपल्याकडच्या काही गोष्टी समोरच्याला दिल्याने शांतता अनुभवास येते. शिवाय त्यांच आयुष्य उजळून निघत हे विशेष. मंडळी आनंद असा सुगंध आहे की, तो दुसऱ्यावर शिंपित जाता स्वतःवरही शिंपला जातो. मग मस्त आहे ना, हा बिनखर्चाचा स्प्रे. म्हणजे बघा, आनंद शोधू जाता दडून बसतो, पकडू जाता निसटतो, आणि त्याच्यामागे धावू लागताचं हुलकावणी देतो, पण जर त्याला सहजपणे घ्यालं, तर सहज प्राप्त होतो. त्यासाठी थोरामोठ्यांची शिकवण वेळोवेळी उपयोगाला येते. आपल्याला बाळकडू पाजण्याचे काम त्यांच्याकडून वारंवार होते म्हणून तर समाजात आनंद नांदतो. संत ज्ञानेश्वरांच्या ओव्यांमधला आनंद परमोच्च बिंदू गाठतो. तुम्ही हसा दुसऱ्याला हसवा. तुम्ही जगा दुसऱ्याला जगू द्या. या विचाराने पछाडलेला एखादा दुसऱ्याच्या आयुष्याचं सोने करतो. लीना-गोविंद सारखे जोडपे. स्वतःचे अपत्य असताना देखील, संस्थेतील मुलगी दत्तक घेण्याचे धाडस करतात. हा त्यांनी साधलेला कौटुंबिक आनंद जो, त्या मुलीसाठी मोलाचा, मार्गदर्शक ठरणार आहे. जसे आनंदी क्षण आपल्या आसपास रेंगाळत असतात. तसे ते टिपण्याची दृष्टी हवी. छोट्या गोष्टीतला आनंद मोठ्या मनाने देता यायला हवा तर आयुष्य सार्थकी लागत.

एक छोटेसे फूल एका दिवसात साऱ्या जगाला आनंदित करते. मग आपण आपल्या मोठ्या आयुष्यात मोठ्या प्रमाणात आनंद वाटायला हवा ना! काल झाले त्याबद्दल दुःख न बाळगता, उद्या काय होणार याची चिंता न करता, आज जे काय करायचे ते आनंदाने. हे सामाजिक कर्तव्य जाणूनच शारीरिक, मानसिक, आंतरिक समाधानपूर्तीसाठी आनंदाचे एक रोपट आपल्या अंगणात लावायला हवे. त्यासाठी आपलं असणं हे खूप महत्त्वाच आहे. कारण आपलं असणं ही आनंदाची खूण आहे. तेव्हा हे 'विश्वची माझे घर' म्हणताना आनंद हा या विश्वाचा एक भाग मान्य करायला हवा. मन करा रे प्रसन्न सर्व सिद्धीचे कारण. सिद्धी आपल्या हातात आहेत, हे जाणून आपला कार्यभाग साधायची, हीच खरी वेळ आहे.

# बौद्ध धम्माची चळवळ गतिमान व्हावी!

## पप्पू कागदे — मंत्री रामदास आठवलेंच्या फंडातून निधी मंजूर



बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी १४ ऑक्टोबर १९५६ साली नागपूर मुक्कामी बुद्ध धम्माची दीक्षा घेऊन सारा भारत बौद्धमय करण्याचा संकल्प केला होता. त्यानंतरच्या काळापासून रिपाइंचे अध्यक्ष तथा केंद्रीय मंत्री रामदास आठवले बुद्ध धम्माचा प्रसार व प्रचार करुन बुद्ध धम्मास गतिमान करण्याचे काम देशपातळीवर करीत आहेत. बीड जिल्ह्यातील धम्म संस्कार केंद्रे निर्माण करण्याचा उद्देश डोळ्यासमोर ठेवून बुद्ध धम्माची चळवळ जिल्हाभर गतिमान करण्यासाठी युवा रिपाइं प्रदेश अध्यक्ष तथा रिपाइं बीड जिल्हाध्यक्ष पप्पू कागदे पाठपुरावा करीत आहेत.

शिवणी येथील भदंत आनंद कौशल्यान नगर येथील बुद्ध विहाराच्या विकासासाठी व धम्म संस्कार केंद्र निर्माण करण्यासाठी युवा रिपाइंचे प्रदेशाध्यक्ष पप्पू कागदे यांनी रामदास आठवले यांच्याकडे पाठपुरावा करून १० लक्ष रुपयाचा निधी मंजूर करून दिला आहे. शिवणी येथील बुद्ध विहाराचे भंते धम्मशील थेरो यांना रिपाइं पदाधिकाऱ्याच्या उपस्थित रिपाइंच्या जिल्हा मध्यवर्ती कार्यालयात युवा रिपाइं प्रदेश अध्यक्ष पप्पू कागदे यांच्या हस्ते फंडाचे मंजुरी पत्र देण्यात आले.

**यांची होती उपस्थिती :** यावेळी राजू जोगदंड, किसन तांगडे, मायाताई मिसळे, दशरथ सोनवणे, अविनाश जोगदंड, प्रभाकर चांदणे, भैय्या मस्के, विजय डोळस, भैय्या आठवे, दिलीप खंदारे, श्याम वीर, भाऊसाहेब दळवी, नवनाथ डोळस, आप्पा मिसळे, अक्षय कोकाटे, अण्णासाहेब सोनवणे यांच्यासह शेकडो कार्यकर्ते उपस्थित होते.

# शोषीत पिडीतांना प्रवाहात आणले

## आठवणी : रुपवते यांना स्मृतिदिनी अभिवादन



नगर/पुण्यभूमी प्रतिनिधी

अँड प्रेमानंद रुपवते यांनी बहुजन शिक्षण संस्थेच्या माध्यमातून शोषित पिडीतांना शिक्षणाचा मुख्य प्रवाहात आणले असे प्रतिपादन आंबेडकरी चळवळीचे अभ्यासक जयवंत गायकवाड यांनी केले

बहुजन शिक्षण संघाचे माजी कार्यकारी विश्वस्त अँड प्रेमानंद रुपवते तथा बाबुजी यांच्या ६व्या स्मृतिदिनानिमित्त अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन संबोधी वस्ती गुहांमध्ये करण्यात आले होते या वेळीं माजी नगरसेवक अजय साळवे वंचितचे नेते सुनील भाऊ शिंदे शिक्षक नेते सतिश चाबुकस्वार आदीनी आपल्या मनोगतातून अँड प्रेमानंद रूपवते यांच्या जीवन कार्याची माहिती विशद करत मनोगत व्यक्त केले. अभिवादन कार्यक्रमासाठी माजी रजिस्टर प्राध्यापक हि एम बैचे सर कॉन्टॅक्टर सुनील राऊत अजय भिंगारदिवे अधीक्षक नितीन कसबे कर रवींद्र तपासे महेंद्र शिंदे पवार मावशी सोनवणे मावशी आदी सह पदाधिकारी व विद्यार्थी उपस्थित होते




# केज विधानसभेच्या रिंगणात खिचडी!

## पडघम : कोण कुठ पळतोय काही कळेना?

केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

केज विधानसभेची निवडणूक जशी जशी जवळ येत आहे तशी उमेदवारांची संगीत खुर्ची चालू झाली आहे.केज मतरसंघ हा गेली ४६ वर्ष झाला अनुसूचित जातीला राखीव आहे,त्यामुळे मातब्बर,प्रस्थापित पुढाऱ्यांची गच्छंती झाली होती.या वेळेस ही राखीव मतदारसंघातून होणारी निवडणूक ही शेवटची असल्याच बोलल जात आहे कारण मतरसंघातील आरक्षण उठणार आहे त्यामुळेच या मतरसंघात उमेदवारांची गर्दी झाल्याचे बघण्यात येत आहे.यात सद्या तरी भाजपचे नमिताताई मुंदडा ह्या आमदार असून त्याच पुन्हा एकदा भाजप कडून निवडणूक लढवतील असे चित्र निर्माण झाले आहे.पण त्यांना पालकमंत्री धनंजय मुंडे कितपत मदत करतात हे त्यांच्यावर अवलंबून आहे.तसेच आमदार नमिताताई मुंदडा यांच्या बद्दल मतरसंघात प्रचंड नाराजी असल्या कारणाने व केज मतरसंघातून लोकसभेला भाजप उमेदवार पंकजाताई मुंडे यांना मताची लिड आमदार नमिताताई देऊ शकल्या नाहीत. त्यामुळेच इतर उमेदवारांच्या आशा पल्लवित झाल्या आहेत त्यामुळेच विधानसभे साठी उमेदवारांची एकच गर्दी झाल्याची पाहिल्या मिळत आहे.या उमेदवारा मध्ये माजी आमदार संगिताताई ठोंबरे.माजी आमदार पृथ्वीराज साठे एक वेळेस विधानसभा लढवलेल्या अंजलीताई घाडगे,प्रसिद्ध उद्योजक विजय व्हावळ,डॉक्टर राहून शिंदे, डॉ नयना सिरसट,रमेश तात्या गालफाडे,इंजिनीअर शिंदे असी वाढत जाणारी यादी आहे यात अजून किती नावे येतात ते जशी विधानसभा जवळ येईल तशी कळत राहील यात विद्यमान सोडल्या तर सर्व जण राष्ट्रवादीकडून(शरद पवार) गटाकडून इच्छुक आहेत यात कोण बाजी मारतय तो येणारा काळच ठरवेल पण केज विधानसभेत मतदाराला आता बद्दल पाहीजे हे एकंदरीत मतदारांच्या बोलण्यातून कळत आहे.आमदार नमिताताई मुंदंडा यांचे कागदावरचे काम प्रत्यक्षात गावात दिसून पान २ वर...

# जुगार अड्ड्यावर पोलिसांचा छापा

## कारवाई : सहाजण घेतले ताब्यात

पैठण/पुण्यभूमी प्रतिनिधी

पैठण शहरातील उच्चभ्रू वस्ती गोपाल नगरात अट्टल जुगारी अयुब मोहम्मद पठाण सह अन्य सहा जुगारींना पैशावर झन्ना मन्ना आणि तिरट खेळतांना पैठण पोलिसांनी रंगात पकडले असून मुंबई जुगार प्रतिबंधक कायद्यानुसार पोलीस निरीक्षक संजय देशमुख यांनी १२(अ) अन्वये गुन्हा दाखल करून सहा आरोपींना अटक करण्यात आले आहे. नंतर आरोपींना वैयक्तिक जातमुचलका वर सोडून देण्यात आले.

याबाबत थोडक्यात माहिती अशी की ,पैठण येथील गोपाल नगर प्रभागात अट्टल जुगारी अयुब मोहम्मद पठाण यांच्या गुप्त ठिकाणी५२ पत्त्यांचा तिरट, झन्ना– मन्ना नावाचा जुगाड सुरू असल्याची माहिती गुप्त खबर्यामार्फत पैठण पोलिसांना मिळाली. त्यानुसार पोलीस निरीक्षक संजय देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली सापळा रचला आणि मोठ्या शिताफीने रोख रक्कम ९ हजार ३१० रुपये आणि ५२ पत्त्यांचा संच आणि आरोपी पान २ वर...

सत्कार...



**बीड :** शेतकरी कामगार पक्षाच्या केंद्रीय कार्यकारणीच्या सदस्यपदी ड.नारायण गोले पाटील यांची निवड झाल्याबद्दल त्यांचा सत्कार करताना मुंजा पांचाळ, विष्णू शेळके, परमेश्वर डाके, राजाभाऊ आव्हाड, अशोक सोळंके, अर्जुन तात्या सोळंके, विनायक काठेवाडे, चेअरमन प्रदीप सोळंके, नुमनभाई चाऊस, राजाराम जमजाळ, परमेश्वर पांचाळ, आमसुले आदी.

# अभ्यासतील सातत्यातून मिळविले यश!

## सक्सेस : डॉ.अंजलीताई घाडगेंनी केला सत्कार



केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

तालुक्यातील नायगाव येथील अभिजित मुजमुले यांची सरळ सेवा भरती परिक्षेतून भूमी अभिलेख विभाग रायगड जिल्ह्यातील कर्जत येथे अभिलेखापाल पदी निवड झाल्या बद्दल त्यांचा केज मतदार संघाच्या सामाजिक महिला कार्यकर्त्या डॉ. अंजलीताई घाडगे यांनी सत्कार करुन अभिनंदन केले. केज तालुक्यातील नायगांव येथील दलित कुटूंबातील अभिजीत महादेव मुजमूले तरुण हा बी.टेक घाडगे, सिव्हील अभियंता असलेला तरुण युवकाने सरळ सेवा परिक्षा दिल्याने त्यांची होते.

अभिलेख विभाग रायगड जिल्ह्यात कर्जत येथे निवड झाल्याची माहीती केज विधानसभेच्या सामाजिक महिला कार्यकर्त्या डॉ. अंजलीताई घाडगे यांना मिळताच त्यांनी पान २ वर...

# योगासन स्पोर्ट चॅम्पियन स्पर्धेत यश

## शैक्षणिक:ढाकेफळ झेडपीचे विद्यार्थी चमकले



केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

महाराष्ट्र योगासन स्पोर्ट्स असोसिएशन आणि ब्रिहंत महाराष्ट्र योगा परिषद अंतर्गत बीड जिल्हा योगासन स्पोर्ट्स चॅम्पियनशिप या स्पर्धेमध्ये जिल्हा परिषद प्राथमिक शाळा ढाकेफळ चे विद्यार्थी सहभागी होऊन उत्कृष्ट कामगिरी केली.या शाळेतील पवन भरत थोरात आणि आणि सिद्धी जनक थोरात या विद्यार्थ्यांनी आर्टिस्टिक्स सिंगल या योग प्रकारात सहभाग घेतला होता उत्कर्ष भाऊसाहेब घाडगे आणि राजवीर महादेव थोरात या विद्यार्थ्यांनी ट्रॅडिशनल योगा या योग प्रकारात सहभाग घेतला होता दोन्ही प्रकारांमध्ये विद्यार्थ्यांनी पान २ वर...

# गेवराई विधानसभा निवडणुक वारे

## पडघम : सुनिल ठोसरच आमदार होण्यासाठी आकांक्षा



गेवराई/पुण्यभूमी प्रतिनिधी

सध्या राज्यात विधानसभा निवडणुकीचे वेध लागले असून लवकरच विधानसभा निवडणुकीच्या तारखे देखील निश्चित होतील. अशातच गेवराई मतदार संघामध्ये संघर्ष योद्धा मनोज दादा जरांगे पाटील यांनी मराठा समाजास आरक्षण मिळावे यासाठी प्रकर्षाने लढा उभा केलेला आहे. त्यामुळे गेवराई मतदार संघात बदल हा निश्चितच आहे. संघर्ष योद्धा मनोज दादा जरांगे पाटील म्हणतात, विधानसभा निवडणुकीत श्रीमंत मराठ्यांना पाडा त्याचमुळे सध्या तरी सामान्य गरीब शेतकरी मराठा कुटुंबातून आलेल्या सुनील ठोसर यांच्या नावाची चर्चा जनतेतून ऐकावयास मिळत आहे.

सुनील ठोसर हे सर्वसामान्य शेतकरी कुटुंबातील असून ते सर्व परिचित असलेल्या गेवराई तालुक्यातील या छोट्याशा सिंदखेड गावचे रहिवासी आहेत. शिव, शाहू, फुले, आंबेडकर यांच्या विचारांनी प्रेरित होऊन गेली अनेक वर्ष समाजकारणात सक्रिय असून त्यांच्या माध्यमातून कोविड १९ लॉक डाऊन काळामध्ये गोरगरीब जनतेपर्यंत राशन किट असो किंवा लॉकडाऊन काळामध्ये शेतकऱ्यांच्या हितासाठी पीक कर्ज पिक विमा शासनाच्या धोरणानुसार वाटप करण्यात यावी यासाठी त्यांनी केलेला संघर्ष, घरकुलधारकांना मिळणाऱ्या लाभाच्या रकमेसाठी वेठीस धरणाऱ्या कर्मचाऱ्यां वर कारवाई करण्यासाठी केलेले आंदोलन असो तसेच श्रावण बाळ इंदिरा गांधी संजय गांधी निराधार या गोरगरिबांच्या मानधना साठी सुरू करण्यात आलेल्या योजनांचा लाभ हा लाभार्थ्यांना मिळवून देण्यासाठी व त्यांना पगार चालू करण्यासाठी त्यांनी केलेला संघर्ष, किंवा दिव्यांग बांधवांचे प्रश्न असो तशीच सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक कार्यात त्यांची अतुलनीय योगदान आहे असल्यामुळे तागायत गोरगरीब जनता ही विसरलेली नसून, सुनील ठोसर हे जनतेची सेवक म्हणूनच सर्व परिचित आहेत. सर्वसामान्य जनतेच्या पान २ वर...

## दूरदृष्टी — शिवराज पवारांच्या हस्ते उदघटनांचा झंजावात

# बाकीचे नेते मतदारांना भेटून त्रस्त



सुशिल टकले/पुण्यभूमी

जसजशी विधानसभा निवडणूक जवळ येऊ लागली आहे तसतसे विविध पक्षाचे व अपक्ष नेते मतदारसंघातील मतदारांच्या गाठीभेटी कशा घ्याव्यात निवडणुकीची रचना कशी असावी मतदारांपर्यंत कसे पोहोचावे यात त्रस्त असून मात्र गेवराई विधानसभा मतदार संघाचे कार्यसम्राट आमदार लक्ष्मण पवार यांच्या माध्यमातून युवा नेते शिवराज दादा पवार विकास कामांच्या उद्घाटनात व्यस्त असून रोज अनेक उद्घाटने त्यांच्या हस्ते सध्या होत आहे.

याबाबत सविस्तर माहिती अशी की, येत्या विधानसभा मध्ये निवडणुकीच्या माध्यमातून आपलं स्वप्न साकार करून अनेक जण आमदार होण्याचे आपलं पाहत आहेत. यासाठी आपापल्या पक्षापर्यंत तिकीट मागणे कार्यकर्त्यांची जुळवाजुळव करणे लोकांपर्यंत मी निवडणुकीला उभा राहणार असल्याचा निरोप पोहोचवणे, कार्यकर्त्यांच्या संपर्कात राहणे मतदारांना भेटणे निवडणुकीची रणनीती ठरवणे व काहीही करून येत्या निवडणुकीत जिंकून आमदार होता होईल असे स्वप्न पाहून त्या दृष्टीने काम करत आहे. रोज अनेक नेतेमंडळी विविध गावात जाऊन मतदारांच्या गाठीभेटी घेऊन येथे निवडणुकीत मदत करण्याची विनंती करण्यात त्रस्त आहे मात्र दुसरीकडे गेवराई विधानसभा मतदारसंघाचा विकासाच्या बाबतीत कायापालट करणारे गेवराई विधानसभा मतदारसंघाचे आमदार लक्ष्मण पवार यांच्या माध्यमातून जो विधानसभा मतदारसंघाचा होत नसलेला विकास मागील काळात त्यांनी करून दाखवल्याने येत्या निवडणुकीमध्ये ना पक्षाला तिकीट मागण्याची गरज ना कार्यकर्त्यांना विनंती करण्याची गरज कारण गावोगावी विकासाचे जाळे निर्माण केल्याने व कार्यकर्ते सक्षम केल्याने मतदान मागण्या त्रस्त न होता विकास कामात व्यस्त झालेल असा संदेश लोकापर्यंत गेला आहे. आमदार लक्ष्मण पवार यांच्या माध्यमातून युवा नेते शिवराज दादा पवार रोज विधानसभा मतदार क्षेत्रामध्ये विकास कामांचे उद्घाटन करत असून याची चर्चा सध्या तालुक्यांमध्ये पाहायला मिळत आहे. अलीकडच्याच काळात पान २ वर...

# सेवानिवृत्त सैनिकांची घोड्यावर मिरवणूक

## नियोजन : मित्र परिवाराने राबविला संकल्प



सोयगाव/पुण्यभूमी प्रतिनिधी

सोयगाव शहरातील गजानन लाड यांची रविवारी सायंकाळी सेवानिवृत्त नंतर सोयगाव शहरात आगमन होताच सायंकाळी सहा वाजता सोयगाव व आमखेडा गावात घोड्यावर मिरवणूक काढण्यात आली होती सोयगाव पोलीस ठाणे पासून सुरू झालेली मिरवणूक सोयगाव बस स्टॅन्ड,गजानन महाराज मंदिर मार्गे शिवाजी नगर आदी भागांतून आमखेडा गावात पोहचली रात्री उशीरा पर्यंत सुरू होती

२४ वर्ष भारतीय सैन्य दलात सेवा बजावून सोयगाव शहरातील गजानन शंकर लाड हे रविवारी सेवानिवृत्त होऊन सोयगाव येथे आले असता गावातील त्यांच्या मित्र परिवाराने त्यांची वाजत गाजत घोड्यावर बसवून सोयगाव व आमखेडा या दोन्ही गावातून मिरवणूक काढली ठिकठिकाणी गावातील महिलांनी त्यांचे औक्षण करून त्यांच्या कार्याला मानवंदना दिली सन सन २000मध्ये वयाच्या २१ व्या वर्षी गजानन लाड हे भारत मातेचे सेवेसाठी भारतीय सैन्य दलात रुजू झाले पुणे येथे पान २ वर...